# श्री साईलीला


या अंकांत—


- राका कुंभार
- ज्ञातून पुण्याचरण कां घडत नाहीं ?
- भक्त सूरदास
- सूर्य-स्तोत्र व त्याचें रहस्य
- लहान भांडणें विसरायची असतात
- थोरामोठ्यांच्या कथा
- स्वामी विवेकानंदांचा राष्ट्रवाद
- शिक्षण म्हणजे सत्संगति
- श्रीशंकराचार्य चरित्र
- उद्धवचिंतन
- श्रद्धावान लभते ज्ञानं
- मृत्युपूर्वीचें निवेदन
- शिशुविभाग कोनशिला समारंभ
- श्रीगुरुपौर्णिमा महोत्सव



सप्टेंबर १९६७

स्थापना १९१६



साईबाबांच्या मूर्ती,
पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचे दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू
सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर,

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. ३५५७३१

स्थापना १९१६



साईबाबांच्या मूर्ती,
पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचे दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू
सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर,

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. ३५५७३१



# श्री साई वाक्सुधा

"साईबाबा हेच आपले मायबाप आहेत. ते अत्यंत कनवाळू आहेत. हांक मारल्याबरोबर आपल्या संकटांत सांपडलेल्या भक्तासाठीं ते धांवत येतात व त्याला संकटमुक्त करतात अशी त्यांची ख्याति आहे. त्यांना जसा तुमचा कळवळा येईल, तसा दुसऱ्या कोणालाही येणार नाहीं. ते हांकेसरशी धांवत येऊन तुम्हांला कडेवर घेतील व मातेच्या प्रेमानें तुमची विचारपूस करतील. जो जें मागेल तें त्याला देऊन दुःखितांचें दुःख दूर करण्यास समर्थ असे तेच आहेत."

—श्रीसाईसच्चरित

---


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४५ वें ] सप्टेंबर १९६७ [ अंक १८ वा

: संपादक :

श्री. द. दि. पाटणकर

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ४५३२६१

: कार्यालय :

साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ,
प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

*******************

या जगांत जन्माला आलेल्या प्रत्येक स्त्रीपुरुषाच्या दृष्टीनें प्रार्थनेचें महत्त्व किती आहे हें शब्दांनी वर्णन करून सांगतां येणार नाहीं; फार तर तें अपरंपार आहे असें म्हणता येईल.

देव दीनांचा वाली व दुःखितांचें दुःख कोणत्या ना कोणत्या परीनें दूर करणारा व तेंच यज्ञकंकण हातीं बांधून बसलेला आहे; परतु याची जाणीव मात्र आम्हांला होत नाहीं.

आपण मनोभावें केलेली प्रार्थना कधींही फुकट जात नाहीं. ती त्याच्यापर्यंत जाऊन पोहोंचते व त्याच्याकडून त्या प्रार्थनेच्या बाबतींत जरूर ती सूत्रें हालविलीं जातात त्याचे मार्ग आम्हांला समजण्यासारखे नाहींत ते अगम्य असतात.

मनुष्य सुखोपभोगांत लोळत असला म्हणजे त्याला सुखाशिवाय व भोगाशिवाय दुसरें कांहीं सुचत नाहीं. तो त्यांतच गर्क असतो. एखाद्या दिवशीं त्याच्या पाठीवर जोराचा फटका बसतो. ज्याच्या किंवा जिच्या सहवासांत तो किंवा ती सुखानें कालक्रमण करीत असते त्यांची ताटातूट होते. दुःख सागरांत ढकललें जाण्याचे दुर्दैव वाट्यास येतें. एकाकी जीवन अत्यंत कष्ट दायक व असह्य वाटूं लागते. जीव नकोसा होतो.

आणि मग अशा एकाकी जीवनांत त्या जन्मदात्याची आठवण होऊं लागते. मन त्याच्या चरणकमलांकडे ओढ घेऊ लागते. "देवा! आतां तूंच माझा पाठीराखा आणि तूंच माझें जीवनसर्वस्व. मला या दुःखतापांतून सोडीव—" अशी त्याची करुणा तो दुःखी भाकूं लागतो.

आणि तो करुणासागर त्या आर्त हांकेकडे लक्ष पुरविल्याशिवाय रहात नाहीं. कोणत्या ना कोणत्या मार्गानें तो तुमचें दुःख हलकें करतो. करणारच! तें तुम्हांला समजत मात्र नाहीं.

कोणत्याही प्रकारचें वियोग-दुःख हें वाईटच. आवडत्या माणसाचा वियोग, संपत्तीचा वियोग किंवा आणखी कशाचा तरी वियोग या जगांतील प्रत्येक माणसाच्या-मागें लागलेलाच आहे. वियोग-दुःखांतून आजवर कोणीही सुटलेला नाहीं, हें आपण नेहमीं लक्षांत बाळगले पाहिजे.

हें वियोग-दुःख हलकें करण्याचा त्या पलिकडे जाण्याचा व त्यावर विजय मिळविण्याचा रामबाण उपाय एकच आहे आणि तो म्हणजे प्रार्थना होय.

तेव्हां त्याच उपायाला आपण शरण गेलें पाहिजे. तो उपाय आपण पकडीत घट्ट धरला पाहिजे. आपणास तारणारा, जीवन सुसह्य व सुखाचें करणारा, असा तो एकमेव मार्ग आहे.

तुमच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला—आणि या आयुष्यांत तो कधीं ना कधीं कोसळायचाच तर तो उल्लंघन करून त्याच्या पलीकडे जाण्याचा व तुम्हांला धीराचा, कर्तव्याचा नी जीवनधारणेचा संदेश प्रार्थनेच्याद्वारें मिळूं शकतो.

आणि यासाठीं आपण श्रद्धायुक्त अंतःकरणानें प्रार्थनेची कास धरायची. त्याला आळवायचें व त्याचें नित्य स्मरण करायचें. "हे प्रभो! आतां तूंच माझा सहाय्यकर्ता व मार्गदर्शक हो. 'तमसो मा ज्योतिर्गमय' या सभोंवार पसरलेल्या अंधकारांत मला प्रकाश-किरण दाखीव, यावज्जीव तूंच माझा सखा व पाठाराखा हो!"

ही आर्त हांक त्याच्या कानापर्यंत जाऊन पोहोंचेलच, परंतु त्यामुळें तुमची अंतःकरण शुद्धि होऊन तुम्हांला जरूर असलेला दिलासाही मिळेल. —संपादक

# राका कुंभार

पंढरपुरामध्यें एक राका या नांवाचा गुजराथी कुंभार राहत असे. तो हरिभक्तिपरायण असे. त्याच्या बायकोचें नांव बांका असें असून त्याला वंका या नांवाची एक कन्या होती. राका कुंभार मातीचीं मडकीं तयार करून तीं विकी आणि आपला उदरनिर्वाह चालवी. कोणे एके प्रसंगीं राकानें मडकीं तयार करून तीं वाळवून माजघरांत ठेविलीं होतीं. त्यापैकीं एका डेऱ्यांत एक मांजरी व्याली होती. आपले भक्ष्याकरितां बाहेर हिंडणें झालें म्हणजे ती भाटी त्या डेऱ्यांत बसून आपल्या पिलांना पाजून म्हा बाहेर जात असे. ही गोष्ट राकाला ठाऊक नव्हती असें नाहीं. पण मडकीं भाजण्याच्या प्रसंगीं राकानें चुकून ती सर्व मडकीं नेऊन आवा रचला. ज्यामध्यें पिलें होतीं तो डेराही त्यानें आव्यांत घातला. आणि आवा पेटवून दिला.

नित्याप्रमाणें भाटी माजघरांत आली तों तेथून सर्व मडकीं हाललेलीं पाहून ती फार घाबरी झाली. ती भाटी लागलीच 'म्यांव, म्यांव,' करीत आव्यासंन्निध आली. मांजरी तोंडानें शब्द करीत आव्याभोंवती घोटाळत आहेसें पाहून राकाला मडक्यांतील पिलांची आठवण झाली. राकानें ती हकीगत आपल्या बायकोला सांगितली. राकाच्या हातून विस्मृतीनें तीं लहान पोरें आव्यामध्यें घातलीं गेलीं असें ध्यानांत येऊन राका आणि बांका हे दोघेजण मोठ्यानें विलाप करूं लागले. प्रल्हादाचें अग्नीमध्यें संरक्षण झालें; पांडवांचा जोहरामध्यें बचाव झाला इत्यादि दाखले देऊन तो हरिभक्त राका त्या पिलांच्या प्राणसंरक्षणाकरितां पंढरीनाथाचा धावा करूं लागला. परमात्मा लवकर पावावा या हेतूनें बाकानें विठोबास कांहीं नवस करण्याबद्दल आपल्या नवऱ्यास सुचविलें. परमेश्वरकृपेनें अग्नीमध्यें पिलें वाचतील तर आपण संसाराचा त्याग करूं. असा राकानें पांडुरंगास नवस केला. श्रीहरीनें आपलें संकट हरण करावें या हेतूनें राकानें एकसारखा देवाचा धावा चालविला. त्याच्या नेत्रांतून ढळढळा अश्रू वाहूं लागले. त्याचीं सर्व गात्रें विकळ होऊन तो तेथेंच धुळीमध्यें लोळूं लागला. आव्यामध्यें अग्नि धडकून राहिला आहे आणि शेजारीच राका कुंभार अन्नपाण्यारहित मातींत भजन करीत पडला आहे, या गोष्टीस दोन दिवस झाले. तिसऱ्या दिवशीं अग्नि शांत झाला. भाजलेलीं मडकीं डोळ्याला दिसूं लागलीं. आवा थंड झालासें पाहून ती मांजरी मोहाच्या योगानें पुन्हा पुन्हा त्या आव्याशेजारीं जाऊन आपल्या पिलांना हांका मारीतच होती. सांगावयाचें आश्चर्य हें कीं, त्या मांजरीची हांक ऐकून डेऱ्यांतील पिलांनींही शब्द करून आपल्या आईला उत्तर दिलें. पिलांचा कोमल स्वर कानावर येतांच राका ताडदिशीं उठला आणि मोठ्या आशेनें त्या जाग्याजवळ गेला. आवाजाच्या धोरणानें त्यानें

आवा फ.डिला तों पिलें असलेला रा .हेरवाच असून .तिन्ही पोरें ज.वंत असल्याद्दल त्याची खात्री झाली. त्यानें तीं पिलें लागलींच बाहेर काढलीं. भाटी आणि तीं पिलें यांच्या पुनर्भेटीचा सोहाळा पाहून राकाला पराकाष्ठेचा आनंद वाटला. कृपणाला द्रव्य-घट सांपडावा त्याप्रमाणें राका उल्हासचित्त झाला. त्याला तीन दिवस अन्नपाणी नसल्यानें तो सर्वतोपरी सुकला होता. पण पोरें जीवंत पाहतांच मेघवर्षामुळें टवटवीत दिसणाऱ्या तृणांकुराप्रमाणें त्याचा च.हरा प्रसन्न दिसूं लागला. आपल्या नवसास पांडुरंग पावला असें समजून त्यानें तावडतोब नवस फेडण्याचें योजिलें. त्यानें गांवांतल्या ब्र.ह्मणांना बोलावून आणिरे. आणि त्यांना आपली सर्व चीजवस्तु अर्पण करून तो संसारतापापासून मुक्त झाला.

त्यानें आपल्या बायकोला एक कौपीन नेसविली. आपण स्वतःही एक कौपीन धारण केला. उदर-पूर्तीकरितां ते रानांतून काटक्या वेंचून आणीत आणि त्या विकून त्याच्यावर पोटें भरीत. त्यांतल्या-त्यांतही ते अतिथीस नित्य भोजन देत. रस्त्यामधल्या चिंध्या वेचून ते त्यांवरच आपल्या वस्त्रापात्राची गुजराण करीत. एके दिवशीं त्याची बायको एका शिंप्याच्या दारांतल्या चिंध्या वेचीत असतां त्या शिंप्यानें तिला अटकाव केला. आपणाला पलिते करण्याकरितां त्या चिंध्या पाहिजेत असें सांगून त्या किडेमारू शिंप्यानें राकाच्या बायकोस दुष्ट शब्दांनीं ताडिलें. शिंप्याची भाषा ऐकून राका आपल्या कांतेस म्हणाला, "दुसऱ्या कोणाला कांहीं उपयोगी नाहीं अशी वस्तु रस्त्यांत सांपडेल तर ती घेऊनच आपण आपली काया झाकावी. अन्य वस्तूस आपण स्पर्शच करूं नये." त्याचें वैराग्य असें कांहीं कडकडीत होते कीं, ढुंगण झाकण्याकरितां तो रस्त्यांत पडलेली उष्टीं पानें उपयोगांत आणी. राक्याच्या या वैराग्याचें माहात्म्य गाणें अशक्य आहे. गाजराची तुळा ब्राह्मणांना दान देऊन त्या पुण्याईच्या जोरावर अंत-काळीं विमानाची वाट पाहणाऱ्या लोकांनीं व्याहलेल्या या संसारांत राक्याची विरक्ति पाहून कोणता सज्जन त्याचे गुणास अनुपम ठरविणार नाहीं ! म्हसोबाला एक पैशाचा शेंदुर अर्पण करतांच त्याच्या मोबदला पुत्र, धन, गृह यांची मागणी करणाऱ्या दुनियेत मांजरांच्या जिवाकरितां संसारत्याग करणारा राका कुंभार ध्यानांत आणिला असतां भगवद्भक्तांचे पोवाडे वर्णन करतांना मन वेडें होऊन जाणे साहजिकच आहे. मनुष्याची तर प्रतिष्ठा फार मोठी नाहीं. पण राक्याचा वैराग्यपर आचार पाहून प्रत्यक्ष परमात्म्याला देखील मोठें कौतुक वाटले.

असो; राक्याची कन्या वंका ही एक दिवस गंगास्नानास गेली असतां तिची घाटावर नामदेवाच्या कन्येशी गांठ पडली. वंका स्नान करून मानसपूजेकरितां खालीं बसलीं. नामदेवाची मुलगी तिच्या शेजारींच धुणी धूत होती. तिच्या धुण्याचें पाणी वंकाच्या अंगावर जाऊं लागलें तेव्हां वंका म्हणाली, "बाई; जरा हलके आपट मी तुकतेंच स्नान करून मानसपूजेला बसले आहे." वंकाची ही सूचना न मानतां

नामदेवाची मुलगी परत बोलली, "पुरें तुझें सोंवळें; जातींची तूं कुंभारीण; दारीं ओसरी हिंडून तुकडे मोडणारे तुझे आईबाप, विठोबाला संकट घालून संसार हाकणाऱ्या माणसांनी सोंवळ्याचा इतका डौल आणावा कशाला?" या तिच्या बोंचक शब्दाला बंकानेंही तसाच जाब केला कीं, "तुझा बाप रडका नामदेव ठाऊक आहे आम्हाला. देवापुढे डोकें फोडून देव प्रसन्न करणाऱ्याच्या पोरीला इतका ताठा हवा कशाला?" इतकीं उणीं उत्तरें होऊन त्या दोघेजणीं आपापल्या घरीं गेल्या. नामदेवाच्या मुलीनें आपल्या बापास घाटावरील मांडण कळवितांच नामदेव देवळांत गेला. नामदेवानें देवाला प्रश्न केला कीं, "राका कुंभार हा निरपेक्ष आहे किंवा कामयुक्त आहे?" पांडुरंगांनीं राकाच्या वैराग्यशीलतेची तारीफ केली. तेव्हां त्याची कसोटी पाहण्याकरितां पांडुरंग रखमाई आणि नामदेव असे तिघेजण अरण्यांत चालते झाले.

नित्याप्रमाणें राका आपल्या पत्नी–कन्ये–सह रानामध्यें काटक्या गोळा करीत असतां त्या त्रिवर्गांच्या दृष्टीस पडला. ते त्रिवर्ग छपून त्याच्या पाठोपाठ राहिले, राका झाडाची काष्टें मोडून घेत नसे; वाळून खालीं पडलीं असतील तेवढीच तो उचली. खालीं पडलेल्या काटकांतही दोन काटके जुळून पडलीं असलीं तर तीं आपणासारख्याच कोणी माणसांनीं जमविलीं असतील असें मानून तो त्यांनाहीं शिवत नसे. हें सर्व पाहून त्या तिघांचीहि पूर्ण खात्री झाली.

—०×०—

# ह्यातून पुण्याचरण कां घडत नाहीं ?

यतो वाचो निवर्तन्ते । अप्राप्य मनसा सह । आनंदं ब्राह्मणो विद्वान् ।
न बिभेति कुतश्चनेति । एतँ ह वाव न तपति । किमहँ
साधु नाकवरम् । किमहं पापमकरवमिति ॥

भावार्थः—ज्याप्रत वाणी व मन हीं पोहोंचूं न शकतां परावृत्त होतात, त्या ब्रह्माचें ज्ञान ज्यास झालें आहे त्यास कशाचेंही भय वाटत नाहीं. मी साधु कर्म—सत्कर्म कां करीत नाहीं, माझ्या हातून पापकर्म कां घडतें, हा विचार त्यास त्रास देत नाहीं.

ह्या विचारानें विद्वानांच्या चित्तास क्षोभ होत नाहीं. ते ह्याविषयीं उदासीन असतात हें खरें. पण प्रत्येकांच्या मनांत माझ्या हातून पुण्याचरण कां घडत नाहीं, पाप कां घडतें, हा विचार नेहमीं येत असतो. आपल्याला जर एखादा छंद असला, व्यसन असलें तर मात्र हा विचार आपल्या मनांत येत नाहीं. आम्हांस संसार हा दुःखमय कां भासतो, जिकडे तिकडे त्रास, क्लेश, पीडा कां दिसतात, ह्याचेंही उत्तर वरील दोन प्रश्नांत आहे. आपलें धन कसें वाढेल, बायकामुलें हीं सुखी कशी होतील, आपला अधिकार, आपला मान कसा वाढेल ह्यांजकडे सर्व लक्ष असतें. मुख्य प्रश्नांकडे आपलें लक्ष नसतें. ह्या सर्व उपाधी आहेत, ह्या सर्व वस्तू प्राप्तव्य आहेत, पण आपल्या हातून पुण्य कां घडत नाही आणि पाप कां घडतें ही चिंता आपल्याशीं अगदीं संलग्न आहे. ज्ञान काय, ऐश्वर्य काय, धन काय, संपत्ति काय यांच्या प्राप्तीच्या योगें आपलेपणा वाढत नाहीं. आपलेपणाचा जो विचार आहे तो ह्या प्रश्नांत आहे. आपण अगदीं एकांतीं असलों म्हणजे या ऐहिक धनाचा प्रश्न आपल्यापुढें सहसा येत नाहीं; किंवा आपलें मोठें नुकसान झालें, आपल्यावर मोठें संकट आलें म्हणजे अगदीं एकांताच्या व शांत अशा वेळीं एरव्हींचे तामस विचार आपल्या मनांत न येतां सात्त्विक विचार मनांत येतात आणि ते विचार ह्या दोन प्रश्नासंबंधींनेंच असतात. त्यावेळीं आपल्या मनांत अशी चिंता उत्पन्न होते कीं, माझ्या हातून हें असें विपरीत आचरण कां घडत असतें ? ह्या चिंतेचा व आपला निजसंबंध, निकट संबंध आहे. ती आपणांशीं अगदीं संलग्न आहे. बाकीच्या सर्व गोष्टी उपाधि आहेत हें सर्व सांगितलेंच. औषधानें रोग दूर होईल, बलानें आरोग्य वाढेल, धन, ऐश्वर्य असलें तर मनुष्य श्रीमान् होईल; हें सर्व आपण जिवाच्या उपाधीसाठीं करीत असतों. दिवसाचे चोवीसचे चोवीस तास आमचे ह्या उपाधीचे मागें लागलेले असतात. खरी जी चिंता ती आमच्या मनांत फार वेळ टिकत नाहीं. बेफाम झालेल्या मुलाला घरांतील वडील मनुष्य आपल्या

त्यकर उपदेशानें त्याच्या दुराचारापासून परावृत्त करीत असतां त्याला ज्याप्रमाणें
। उपदेश कडू वाटतो, त्याप्रमाणें ही चिंता मोठी गुणकारी असूनही तिला आम्हीं
रा देत नाहीं, ती चिंता मनांत बाळगल्यानें खरें सौख्य प्राप्त व्हावयाचें असें जरी
ाहे, तरी तिच्यापासून आम्ही होईल तितकें दूर राहत असतों. ब्रह्म जाणण्यांत खरा
नुष्यधर्म आहे. ज्यानें ब्रह्म जाणिलें त्याला ह्या व्याधीपासून त्रास व्हावयाचा नाहीं.
। खरा विद्वान; तो मुक्त झाला म्हणावयाचा.

ह्या उपनिषदाच्या सातव्या अनुवाकामध्यें ब्रह्माचें लक्षण असें सांगितलें आहे:—

रसो वै सः । रसँ ह्येवायंलब्ध्वाऽऽनन्दी भवति । को ह्येवान्यात्कः प्राण्यात् ।
देष आकाश आनन्दो न स्यात् । एष ह्येवाऽऽनन्दायति ।...भीषाऽऽस्माद्वातः
वते । भीषोदेति सूर्यः । भीषास्मादग्निश्चेन्द्रश्च । मृत्युर्धावति पंचम इति ।

**भावार्थः**—तो सर्व पदार्थांचा स्वाद आहे. त्या स्वादाची प्राप्ति झाली असतांच
ीवात्मा आनंद पावतो; तो आनंदस्वरूप नसता, तर कोण प्राणी जिवंत राहूं शकता?
त सर्वांस आनंदानें भरितो, त्याच्या भयामुळें वायु वाहतो, सूर्य उदय पावतो व
द्र, अग्नि व मृत्यु आपापलीं कामें करितात.

ब्रह्म हे ह्या सर्व गोष्टीचा रस आहे. हा रस प्राप्त करून घेतला असतां आनंद
तो. ब्रह्मप्राप्तीचा रस जीवात्म्याला प्राप्त झाला असतां जीव आनंद पावतो. जर
रमात्मा, कीं ज्याचा आपल्या सर्वांच्या आत्म्यांत वास आहे, आनंद नसता, तर
ापले प्राण कसे राहिले असते? कोणाचे प्राण रक्षिले असतां, बालकाची अज्ञान-
णाची चेष्टा पाहिली असतां, सारांश, पृथ्वींतील अनेक चेष्टा पाहिल्या असतां
ापणांला आनंद कां होतो? तर ह्यांचा व त्या आनंदाचा परस्पर कार्यकारण
ंध आहे म्हणून. तो नुसता आनंद नसून आपणांस आनंदवीत असतो. मातेंतील
ापल्या मुलांविषयींचें प्रेम त्या आनंदापासून प्राप्त झालेलें. मित्राची आपल्या मित्रा-
षयींची पूज्यबुद्धि त्यापासून झालेली. स्नेही, मित्रपरिवार, सारांश, आनंद उत्पन्न
रणारे जेवढे संबंध ते सर्व त्याचे भाग आहेत. पण तो आनंदमय आहे, म्हणून ह्या
र्व ठिकाणीं आनंद आहे. पण तो अदृष्ट आनंद आहे. झाडाला पानें, फुलें, येतात,
ळें येतात, तें मोठें टवटवीत असतें, तेव्हां त्या झाडाचें गौरव कोणी करीत नाहींत,
ुलांचें करीत नाहीं, फळांचें करीत नाहीं, तर त्यांतील अदृष्ट रसाचें गौरव करीत
सतात. रखरखीत प्रदेशांत, कीं जेथें आसपास पाणी नाहीं, दुसरें झाड नाहीं,
ावसाचे दिवसही नाहींत, अशा वेळीसुद्धां जो अदृष्ट रस त्या झाडाला टवटवी
णीत असतो, त्याला पालवी आणितो, फुलें फळें प्राप्त करून देतो त्या अदृष्ट
साचें गौरव सर्व जन करीत असतात. वृक्षांतील अदृष्ट रसाप्रमाणेंच हा आनंद
दृष्ट आहे. तेव्हां असा जो हा परमात्मा त्याचें ऐश्वर्य, सामर्थ्य तरी किती, असा
िचार येथें मनांत येण्याचा संभव आहे. हा कल्याण करणारा असून मोठा सामर्थ्य-

वान् आहे. वारा कसा कांपत असतो, सूर्य वेळच्यावेळीं कसा उगवतो, याचें का
शास्त्राचे दृष्टीनें कांहीं असो; धर्माच्या दृष्टीनें खरें कारण हें कीं, सूर्य त्याच
भयानें वेळेवर उगवतो. वारा त्याच्या स्वरूपाला कांपत असतो, म्हणून सर्व ठिका
वाढत असतो. त्याचें सामर्थ्य इतकें आहे कीं, मृत्यु देखील त्याचे भयाने धां
असतो.

मनुष्याचा आनंद जर एक धरिला, तर अशा शंभर मनुष्यांच्या आनंदाबरो
एका गंधर्वांचा आनंद आहे. शंभर गंधर्वांच्या आनंदाबरोबर एका देवगंधर्वा
आनंद. शंभर देवगंधर्वांच्या आनंदाबरोबर एका पितरांच्या देवाचा आनंद. अ
परंपरा लागून शेवटीं आनंदाचा आगर परमात्मा आहे. सारांश मिळून इतकाच की
या आनंदाची गणति करणें शक्य नाहीं. असा आनंद ज्या ठिकाणीं वसत आ
त्या ठिकाणीं आल्यावर कशाचें भय नाहीं, भीति नाहीं. ज्याच्यासाठायीं इतका आनं
आहे तो सामर्थ्यवानही तसाच आहे.

आपण जीवंत असतांना थोरांशीं सहवास केला, त्यांचेच सान्निध्यांत नेहमं
राहिलों, त्यांचे आनंदांत आनंद मानिला, त्यांचे अनुरोधानेंच आपण चाललों. त
त्यांत आपल्याला भय नाहीं. आपल्या कल्याणाचा तो एक मार्ग आहे. पूर्वी सांगि
तलेला आनंद ज्यांस प्राप्त झाला असेल त्यांस माझ्या हातून पापाचरण कां घडतें,
पुण्य कां घडत नाहीं, ह्या प्रश्नांची टोंचणी लागत नाहीं. प्रश्नाचीं उत्तरें अन्यद्वारें
अन्य रीतीनें मिळतील, नाहीं असे नाहीं. पण खरें उत्तर वर सांगितल्याप्रमाणें आहे
वास्तविक पाहिलें तर आम्ही साधुपुरुषांशीं संगत करीत नाहीं आमचा स्नेह
नेहमीं पापकल्पनांशीं फार असतो. पण, साधुपुरुषांशीं सहवास केल्यास शांति प्राप्त
झाल्यावाचून राहात नाहीं. आपल्यांत व परमात्म्यांत अनंत समुद्राइतकें अंतर आहे.
पण, साधुपुरुषांची गोष्ट तशी नाहीं. त्यांच्यात व परमात्म्यांत फार अंतर नाहीं.
संकल्पविकल्पांत पाप असतें. पण, ज्यांनी आपल्या हृदयांत परमात्मा सांठविला आहे,
त्यांना दुसरा विषयच दिसत नाहीं. आपल्यासाठायीं परमेश्वराविषयीं आवड कां
होंत नाहीं, परमेश्वरापासून आपण दूर दूर कां राहतों, ह्याचें उत्तर आपलें
मनच देऊं शकेल. आपण आपल्या स्वतःशींच विचार करीत बसावें.
म्हणजे वास्तविक स्थिति काय आहे ती आपणांस दिसून परमेश्वरापाशीं अनन्यभावें
जात असतांही आपला हिरमोड होतो, असा प्रकार अशा वेळीं आपणांस
आढळावयाचा नाहीं. उलट आपला व अन्य लोकांचा अनुभव असा आहे कीं,
परमेश्वर नेहमी हातांत प्रेमाचें भातुकें घेऊन उभा आहे. उभा आहे म्हणजे एकाद्या
शिळेवर उभा आहे, असा भाग नव्हे, तर तो या सर्व ब्रह्मांडात व्यापून राहिला आहे.
तो वाटेल तेव्हां हातभार द्यावयास तयार आहे. तो आमचें कल्याण करावयास तत्पर

आहे. आम्ही मात्र आपलें कल्याण करून घ्यावयास सिद्ध नाहीं. आपण आपल्या मातेची अवज्ञा करीत असतों; पित्याची अवज्ञा करीत असतों. आपणांस हितबोध सांगणाऱ्या आप्तांची अनेक वेळा अवज्ञा करीत असतों. आणि परमेश्वराची तर हरप्रसंगीं करीत असतों. असें आहे तरी परमेश्वर आपलें प्रेमाचें भातुकें घेऊन आपल्या सन्निध नेहमीं उभा आहे. आपल्याला सुख कसें प्राप्त होईल, आपल्यावरील संकटें कशीं दूर होतील अशाविषयीं अतुल प्रेमानें परमेश्वराचे नेहमीं संकेत चाललेले असतात. परमेश्वराचें हें प्रेमस्वरूप आहे. उपनिषदांतील स्वरूप देखील हेंच आहे.

तेव्हां वास्तविक पाहिलें, तर आपण सर्व निजलेले आहों. आपणांस गाढ निद्रा लागली आहे. आपलें हित कशांत व अहित कशांत, हेंहि आपणांस कळत नाहीं व घडोघडी, पळोपळीं परमेश्वराची जी अवज्ञा करीत असतों त्यामुळें त्याची व आपली भेट होत नाहीं व उलट आपण त्याचेपासून दूर दूर जात असतों. म्हणून माझ्या हातून साधुकर्म कां घडत नाहीं, पापाचरणाकडेच ओढा कां, हा प्रश्न आपल्यासमोर सतत ठेवावा. हा प्रश्न नेहमीं आपल्यासमोर ठेवून त्यासंबंधानें विचार करणें हा जरी एक रोग आहे, ही जरी एक मोठी चिंता आहे, व्याधि आहे, तरी हा प्रश्न मोठें बल आहे. ह्याच्यांत मोठें सामर्थ्य आहे. ह्याचा सतत विचार निजकल्याणास कारण होणार आहे. म्हणून पुनः पुनः सांगावयाचें तें हेंच कीं, माझ्या हातून पापाचरण कां घडत नाहीं, हा विचार जरी सकृद्दर्शनीं आनंदकारी नसला तरी त्यापासून आपलें खरें कल्याण होणार आहे. खरें कल्याण साधून घेण्यास तोच एक उपाय आहे हें लक्षांत ठेवून तो विचार सतत आपल्यापुढें ठेवावा.

# भक्त सूरदास

हस्तनापुरावर स्वामित्व चालविणाऱ्या अकबर बादशहाच्या पदरीं सूरदास या नांवाचा एक भगवद्भक्त होता. त्याच्या चाकरीनें संतुष्ट होऊन अकबरानें त्याला मथुरादेशाचा सर्व कारभार सांगितला होता. तो सूरदास धर्मशील व दयावंत असल्यानें तो संतसेवा करण्यांत तत्पर असे. तो आपल्याजवळचें सर्व द्रव्य सत्पात्रीं दान करण्यांत खर्चीत असे. नानाप्रकारचीं पक्वानें तयार करवून तो साधुसंतांना भोजनें घालीत असे.

असें अन्नदान करितां करितां तो दरिद्री झाला. वैष्णवांना भोजनें घालण्यांत अंतर पडूं लागलें. त्याला स्वतःच्या प्राणापेक्षांही संतसेवा प्रिय असल्यानें जिवावर उदार होऊन त्यानें राजाचें भांडार फोडिलें आणि त्यांतील सर्व धन संतचरणीं खेरात करून टाकिलें.

त्याचा दिवाण दुराचारी होता. त्यानें ताबडतोब तो वृत्तांत बादशहास जाहीर केला. तुळशीच्या झाडास घातलेलें पाणी वांया गेलें असें मधुर पुष्पप्रिय जनांना वाटत असे. तापसी मनुष्याच्या तीर्थाटणाला विलासी लोक भ्रमण असें नांव देतात. यज्ञामध्यें ओतलेलें तूप व्यर्थ गेलें म्हणून अज्ञानी लोक हळहळतात, त्याचप्रमाणें सूरदासानें साधुप्रीत्यर्थ खर्चलेल्या द्रव्याचा दुरुपयोग झाला असें मानून अकबर खवळला. अकबरानें लागलाच एक हुकूम खरडला. आणि त्या प्रांताचा सर्व खजीना बरोबर घेऊन सूरदासास देखत हुकूम हस्तनापुरास बोलाविलें. तो हुकूम घेऊन बादशहाचे दूत सूरदासाच्या वाड्यांत जाऊन उभे राहिले. सूरदासानें बादशहाचा हुकूम वाचून पाहिला आणि दूतांना सांगितलें, "माझ्याविषयीं बादशहाला कोणीतरी खोटी वर्दी दिली असावी. मी राजाचें द्रव्य उधळलें नाहीं. तें द्रव्य खर्चून मी राजाकरितां अमोल जवाहीर खरेदी केलें आहे." असें बोलून त्यानें घरांत जाऊन घरांतून दोन पेट्या बाहेर आणल्या. त्या पेट्यांत गारगोट्या भरल्या असून त्यांना कुलुपें ठोकून त्यांच्यावर मोहोर केली होती. त्या संदुकांत सूरदासानें राजाला एक पत्र लिहून ठेविलें होतें. त्या पत्रांत असा मजकूर होता कीं, "आपलें सर्व द्रव्य मीं सूरदासानें साधुसंताप्रीत्यर्थ खर्चून टाकिलें हेंच खरें आहे. आपल्या खजिन्यांत एकंदर पैकी लक्ष दहा हजार रुपये होते. ते सर्व मीं सूरदासानें सत्पात्रीं दान केले."

अशा अर्थाच्या पत्रासह पेट्या दूतांच्या स्वाधीन करून सूरदासानें त्यांच्यासह राजदर्शनास पहाटे निघावयाचें असें ठरविलें आणि सर्वजण निजले. अर्ध रात्रीच्या

सुमारास सर्वत्र सामसूम पाहून सूरदासानें पोबारा केला आणि एका अरण्यांत जाऊन तेथें तो हरिभक्त भजन करीत बसला.

पहाटेच्या सुमारास दूतांनीं सूरदासास हांका मारिल्या. राजाच्या भयानें सूरदास पळून गेला असें जाणून ते दूत त्या मुख्य ऐवजाच्या पेट्या घेऊन हस्तनापुरास चालते झाले.

दूतांनीं बादशहाला सूरदासाची हकीकत निवेदन करून त्या जवाहिराच्या पेट्या त्याच्यापुढें ठेविल्या. अकबरानें विस्मित होऊन बिरबलाकडून त्या पेट्या उघडविल्या तों त्यांत जवाहिराच्या ऐवजीं गारा भरलेल्या पाहून दूत थराथरा कापूं लागले. इतक्यांत बिरबलाची नजर त्यांतील पत्रावर गेली. बिरबलानें बादशहासमोर सर्वांच्या देखत पत्रांतील मजकूर वाचला.

सूरदासानें आपला खजिना सत्पात्रीं खर्च केला असें जाणून तो श्रद्धाळू व उदार अकबर आनंदित झाला. त्यानें चहाडखोर दिवाणास वैष्णवद्वेषी समजून चांगलें खडसाविलें. राजभांडार उघळून परमार्थसाधन करणाऱ्या सूरदासाविषयीं सप्रेम होऊन अकबरानें त्याला हुडकून काढण्याकरितां चारी दिशेच्या अधिकाऱ्यांना पत्रें पाठविलीं. त्या पत्रांचा मजकूर चोहोंकडे जाहीर झाला. यावेळीं सूरदास मथुरेतच होता. त्याला बादशहाच्या पत्राची बातमी लागतांच तो आपण होऊन निर्भयपणानें बादशहाच्या भेटीस गेला.

सूरदासाच्या सत्वसंपन्नतेमुळें बादशहा आधींच फिदा झाला होता. त्यानें सूरदासाच्या धर्मशीलतेबद्दल त्याला शाबासकी देऊन पहिला अधिकार चालविण्यास सांगितलें. तेव्हां सूरदास म्हणाला, “मीं प्रपंचाचा त्याग केला आहे. आतां आपण मला पुनः भवपाशांत कशाला घालतां ?”

सूरदासाची निरपेक्षता पाहून बादशहानें त्याला संतसेवा करण्याच्याच अधिकारावर नेमून ऐशीं लक्ष दहा हजार उत्पन्नाच्या त्यास सनदा लिहून देऊन तितकें द्रव्य सालोसाल धर्म करण्याची अनुज्ञा दिली.

मग निर्भयचित्त होऊन सूरदास मथुरेंत राहून साधुसेवा करूं लागला. तो हरतऱ्हेचें गीत रचून कीर्तन करूं लागला. चित्तामध्यें भावार्थ भरून तो कृष्णकृपेचा अभिलाष धरून बसला.

# सूर्य-स्तोत्र व त्याचें रहस्य

लेखक : श्री. वि. के. छत्रे

१ नमः सूर्यनारायणा ! देवराया ! । तुझें केवढें प्रेम विश्वावरी या ? ॥
सकाळीं तुझ्या कोंवळ्याशा करांत । जणूं घालिशी स्नान आम्हां मजेंत ! ॥

२ जगाचा पहाया स्वयें कारभार ! प्रभो, प्रत्यहीं येसि, आश्चर्य फार ! ॥
दिनाचाहि अद्यापि ना खंड झाला । नसे चूकली नेमिलेलीहि वेळा ॥

३ नभाच्या सभामंडपीं तूं प्रवेश । करीसी तदा होय विश्वास हर्ष ॥
हजारों करीं तूं दृढालिंगनातें । यदा देसि आम्हां, न सीमा सुखातें ॥

४ मनीं वासना दुष्ट येवो न आज । कुकर्मांत वाटो मना फार लाज ॥
मुखांतून येऊन वाचा कठोर । कुणाच्याहि मर्मीं करो न प्रहार ॥

५ अम्हां देसि तूं स्वच्छ देवा ! प्रकाश । तशी उष्णता, जी करी शीतनाश ॥
करी आपुल्या शोषिसी तूं जलातें । पडे वृष्टि तेणें, मिळे खावयातें ॥

६ तुला सार्थची शोभतें नाम ' मित्र ' । जगाचा खरा तूंच कीं एक मित्र ॥
जरी घेसि विश्रांति एका दिनाची । मृतप्राय होईल ही सृष्टि साची ! ॥

७ यदा येसि मध्यान्हि या लोचनांनीं । पहावेचि ना, नेत्र जाती दिपूनी ॥
जरी एवढें तेज तूझें अपार । किती दीप्तिमान् तो तुला निर्मिणार ? ॥

८ उद्यां निश्चयें येसि या जाणिवेनें निरोपा न कोणीहि दे आदरानें ॥
करी मूक जो लोककल्याण नित्य । उपेक्षा तयाची जगीं, हेंचि सत्य ! ॥

९ प्रभो ! चक्षु तूं एक सर्वेश्वराचा । निमेषाविना सर्वसाक्षी क्रियांचा ॥
तथापी असत्कर्म तें आचरीतां । अम्हां वाटतें, ना कुणीही पहाता ॥

१० प्रभो ! प्रत्यही सुप्रभाती उठून । नदीतीरिं वा सिंधुतीरिं बसून ॥
शुचिर्भूत, होतांच तुला नमावें । पहातां तुझ्या दिव्यरूपीं विरावें ! ॥

× × ×

# श्रीसूर्यस्तोत्ररहस्य।

१ हे सूर्यनारायणा, तूं रोज सकाळीं उदयास येऊन आम्हांला आपल्या कोंवळ्या किरणांनीं स्नान घालतोस. या विश्व वर तुझें केवढें हें मोठें प्रेम, तुला प्रणाम असो.

२ प्रभो, जगांत कोण काय करतो हें पहाण्यासाठीं कोण प्रतिनिधीस न पाठवितां तूं स्वतः येतोस हे एक आश्चर्य आहे. तूं उगवला नाहींस असें कधीं आजवर घडलें नाहीं व उगवण्याची नेमून दिलेली तुझी वेळहि कधीं टळली नाहीं. आम्हीं माणसें मात्र आळसानें कधीं कधीं कामावर जात नाहीं व कधीं कधीं वेळेवरहि जात नाहीं धिःकार असो आम्हांला!

३ एखाद्या राजाधिराजाप्रमाणें तूं आकाशरूपी सभामंडपांत प्रवेश करतोस तेव्हां सर्व विश्वास आनंद होतो. हजारों किरणरूपी करांनीं तूं आम्हांस प्रेमभरानें जेव्हां आलिंगन देतोस, तेव्हां जें कांहीं सुख वाटतें त्याचें वर्णन करणें केवळ अशक्य!

४ देवा, आज एक मागणें मागतों. कोणत्याहि प्रकारची दुष्टवासना आमच्या मनांत निर्माण न होवो; व तशी यदाकदाचित् आधींच निर्माण झाली असेल तर ती घालविण्यासाठीं वाईट कर्म करतांना मनांत लाज तरी उत्पन्न होऊं दे, म्हणजे तें कर्म घडणारच नाहीं. दुसऱ्याच्या वर्मी झोंबेल अशी वाणी आमच्या मुखांतून न निघो. भगवन्, 'तथास्तु' असा आशीर्वाद आपल्या मुखांतून बाहेर पडो.

५ जीवनोपयोगी अवश्य त्या सर्व गोष्टी तू आम्हांस पुरवतोस, व्यवहारासाठीं स्वच्छ प्रकाश, थंडीची बाधा नाहींशी करण्यासाठीं उष्णता इत्यादि आपल्या किरणांनी नदी-समुद्र-तळीं इत्यादि जलाशयांतून तूं पाणी शोषून घेऊन ढगांत सांठवतोस व कडक उन्हाळ्यानंतर जिकडेतिकडे पाऊस पाडून सृष्टि हिरवीगार करून सोडतो. ती पाहून डोळ्यांना केवढा आल्हाद होतो! अन्तरात्मा शान्त होतो. नदी कंदमुळे, फळे व धान्य निर्माण होऊन आमच्या पोटाला मिळतें. 'सूर्यः आत्मा जगतस्तस्थुषश्च' हें जें वेदांनीं केलेलें वर्णन यथार्थ आहे.

६ तुला 'मित्राय नमः, रवये नमः, सूर्याय नमः, भानवे नमः, खगाय नमः, पूष्णे नमः, हिरण्यगर्भाय नमः, मरीचये नमः, आदित्याय नमः, सवित्रे नमः, अर्काय नमः, भास्कराय नमः, श्रीसवितासूर्यनारायणाय नमः' अशा बारा नांवानीं प्रणाम करण्याची पुरातन पद्धति आहे. यांतील 'मित्र' हें नांव तुला खरोखर सार्थ व शोभून दिसतें, कारण तूं जगाचा एक परममित्र आहेस. निःस्वार्थी मित्रावांचून माणसाचें,

तसें तुझ्यावांचून या जगाचें चालावयाचें नाहीं. एकच दिवस जर तूं उगवला नाहीस तर ही सर्व सृष्टि मृतप्राय होईल !

७ तूं बारा वाजतां डोक्यावर येतोस तेव्हां तुझ्याकडे या चर्मचक्षूंनीं बघवत नाहीं. डोळे दिपून जातात. इतकें प्रखर जर तुझें तेज, तर तुला निर्माण करणारा परमेश्वर किती तेजस्वी असेल याची कल्पनाहि करवत नाहीं.

८ उद्यां तूं नक्कीच उगवणार या खात्रीमुळें अस्तास जातोस तेव्हां तुला आदरपूर्वक निरोप देण्याचें कोणाच्या फारसें ध्यानांतच येत नाहीं. ' अतिपरिचयात् अवज्ञा. ' रोज तूं मुकाट्यानें उगवतोस, आपली दिवसाची कामगिरी बजावून मुकाट्यानें मावळतोस—घरीं जातोस. तूं कांहीं मोबदला मागत नाहींस. त्यामुळें तूं आलास काय अगर गेलास काय, लोकांना त्याचें महत्व वाटत नाहीं. आपल्या कामाचा गाजावाजा न करतां, जे लोक—कल्याणाच्या कार्यांत नित्य मग्न असतात, त्यांची बहुधा लोकांकडून उपेक्षा केली जाते, हेंच खरें !

९ भगवन्, तूं परमेश्वराचा एक डोळा ( दिवसा सूर्य व रात्रीं चंद्र असे दोन डोळे परमेश्वराचे मानले जातात. ) असून जगांतील प्रत्येक माणूस काय काय कर्में करतो याच्याकडे तुझी सूक्ष्म नजर असते व त्याची अचूक नोंदहि तूं घेऊन ठेवतोस. पण दूध पिणाऱ्या मांजरास जसें आपणांस कोणी पाहणारें नाहीं असें वाटतें त्याप्रमाणें पापकर्म करतांना आम्हांसहि वाटतें. केवढें आमचें अज्ञान !

१० असें फार वाटतें कीं रोज पहांटे उठून नदीतीरावर अगर सिंधुतीरावर जाऊन शुचिर्भूत होऊन, ' जणुं तापलेला उठे लोहगोळ ' अशा स्वरूपांत पूर्व क्षितिजावर उदयास येतांना तुला डोळे भरून पहावें, वंदन करावें व पाहतां पाहतां तुझ्या दिव्यरूपांत विरून जावें !

---

## साई—संस्थान हॉस्पिटल शिशुवार्ड कोनशिला

नामदार शेषराव कृ. वानखेडे. मंत्री ( अर्थ, न्याय, विधी, महाराष्ट्र राज्य ) यांचे शुभहस्ते ता. २०–७–६७ गुरुवार रोजीं शिशुवार्ड कोनशिला समारंभ झाला. या समारंभाकरिता हॉस्पिटल नजिक हायस्कूलचे भव्य पटांगणांत सुंदर शामियाना सुशोभित ध्वज पताका रोषनाई मंडप उभारण्यांत आला होता, दुपारी ४॥ वाजतां प्रमुख पाहुण्यांचें आगमन होतांच स्काउट बँड पथक सलामी देऊन स्वागत केलें. त्यानंतर स्वागत गीत झालें. आलेल्या पाहुण्यांची ओळख संस्थान रिसीव्हर साहेबांनी करून त्याना कोनशिला पुजनाचे पाचारण केलें त्यानंतर हॉस्पिटल शिशुवार्ड कोनशिला पूजन झालें. पाहुण्यांना हारतुरे निरनिराळे संस्थेतर्फे अर्पण करण्यात आले. त्यानंतर शिशुवार्ड संबंधी मे. सी. पी. गोडसे चॅरिटी कमिशनसाहेब यांचे भाषण झाले. त्यानंतर कांही वक्त्यांची भाषणें झाली. त्यानंतर मुख्य पाहुणे नामदार वानखेडे यानी शिशुवार्डसंबंधीं यथायोग्य भाषण करून धन्यवाद दिले. त्यानंतर साई संस्थानचे रिसीव्हर डी. डी. पाटणकर यानी सर्वांचे आभार मानले व अल्पोपहार होऊन हा गोड समारंभ समाप्त झाला. या समारंभाकरितां एम्. व्ही. देव [ रेव्हेन्यू कमिशनर साहेब पुणे], बी. पी. दलाल [ सेक्रेटरी लॉ. डि. ] सी. पी. गोडसे [ चॅरिटी कमिशनर] डी. डी. रणदिवे [ जिल्हाधिकारी अ. नगर ] एम. बी. माडगांवकर [ सॉलिसीटर मुम्बई ] जी. डी. नगरवाला [ सालिसीटर मुंबई ] व कोपरगावची पुढारी व अधिकारी मंडळी; राहता येथील कांहीं पुढारी व अधिकारी मंडळी हजर होती.



IN THE COURT OF THE PRESIDENCY MAGISTRATE,
ESPLANADE, BOMBAY.

## Schedule

## Form of Declaration Form I ( See Rule 3 )

I, Dattatray Dinkar Patankar, declare that I am the Publisher of the magazing entitled, " Shree Sai Leela " to be printed at the Ramkrishna Printing Press, Rukmini Niwas, Morbaug Road, Dadar Bombay-14, and published at the office of Shri Sai Baba Sanstan, "Sai Niketan", 804-B Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14, and that particulars in respect of the said magazine given hereunder are true to the best of my knowledge and belief;—

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Title of the Magazine | : | " Shree Sai Leela " |
| 2 | Language in which it is published | : | Marathi |
| 3 | Periodicity of its publication and dates on which published | : | Monthly, 1st of each month. |
| 4 | Retail selling price per copy | : | 50 Paise; Rs. 5/- per annum. |
| 5 | Printer's Name | ; | Dattatray Dinkar Patankar |
| | Nationality | ; | Indian |
| | Address | : | Sai Niketan, 804-B Dr. Ambedkar Road, Bomday 14. |
| 6 | Place of Publication | ; | Office of Shri Sai Baba Sansthan, Shirdi (address as above) |
| 7 | Printer's Name | : | Sharad Krishnaji Saple |
| | Nationality | : | Indian |
| | Address | : | Rukmini Niwas, Morbaug, Road, Dadar, Bombay 14. |
| 8 | Name of the Printing Press where it is printed and true and precise description of the premises on which the Press is installed | : | Ramkrishna Printing Press, Rukmini Niwas, Morbaug Road, Dadar, Bombay-14. |
| 9 | Editor's Name | : | Dattatray Dinkar Patankar |
| | Nationality | : | Indian |
| | Address | : | Sai Niketan, 804-B Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14. |

# लहान भांडणें विसरायची असतात

लेखक : ग. श्री. खैर

कदा मी मुंबईहून नाशिकला चाललों होतों. मी डब्यांत बसल्यावर एक गुजराथी कुटुंब येऊन पलीकडे बसले. त्यांनीं आपले जड सामान माझ्या डोक्यावरच्या क शेल्फवर ठेवले. मी सांगितले, 'तेथे ठेवू नका—डोक्यावर पडेल.' त्यावरून तील बाईची व माझी जरा कडू बोलाचाली झाली. अशा वातावरणात आमचा स सुरू झाला.

मी डोळे मिटून गीतेतील एकेका अध्यायाचे मनातच पठण आणि चिंतन त बाराव्या अध्यायापाशीं येऊन भक्तियोग संपवला, अन् माझी तंद्री भंगली.

"आपण यांतले काही खायला घ्या ना"—त्या बाईने माझ्यापुढे आपला डबा न मला सौजन्यपूर्वक विनंती केली.

मी—"मला पथ्य आहे, मी काही खात नाही. माफ करा."

त्या—"हें पथ्याचेच आहे. आमच्या मंडळीकरितां मुद्दाम आळणी आहे."

मी—"पण मी नुसता दूध—फळावर आहे. आपण घ्या.

अशा रीतीने आमच्या मौनभंगाला प्रारंभ झाला. त्या बाईंनी माझ्या आजाराची शी करून एका प्रसिद्ध वैद्याचें नाव व पत्ता देऊन त्यांचे औषध घ्यायचा आग्रह . मीही त्यांच्या साहेबांच्या आजाराविषयी माहिती विचारली. त्यांना एक दुर्धर झाला होता व त्याकरिता मुंबईला खेपा चालू होत्या. परस्परांच्या सुखदुःखांची ही देवघेव केली, आणि गाडी सोडताना हसत हसत निरोप घेतला.

मी तत्त्वे सांगणारा लेखक, त्या व्यवहारकुशल भगिनी होत्या. "लहानसहान णे विसरायची असतात." असा उपदेश मी करीत असतों. पण त्याचें आचरण णि उदाहरण त्या बाईंनी मला शिकविले.

आमची आजी नेहमी म्हणायची—"भांड्याला भांडे लागून आवाज व्हायचाच; न काही भांडी फोडायची नसतात. भांडी एकत्र ठेवलीच पाहिजे." माणसांच्या गांत जिवंत आहे तोपर्यंत लहानसहान गोष्टींवरून भांडणे व्हायचीच. पण ती आपुलकीने ठेवून विसरायची असतात. भांडणांच्या मुद्द्यांपेक्षा आपल्या सुखदुः-

त्यांच्या समान देवघेवीच्या गोष्टी कितीतरी अधिक आहेत, नाही का? परस्परां पाहिजे असते सहानुभूती, प्रेम, मदत व सहकार्य. या गोष्टी दिल्याने दुप्पट होऊ सव्याज परत मिळतात. भांडणे जपणारा माणूस स्वतःच मनात झिजत राहातो कुटुंबांतील माणसे, गावातले पार्टीवाले, घरमालक-भाडेकरू, जमीनदार-कुळे, माल नोकर, धनको-ऋणको-अशा सर्वांनीच भांडणाचे मुद्दे बाजूला ठेवून इतर गोष्टींविषय व इतर प्रसंगी प्रेमाने वागायला काय हरकत आहे? विचार करा.

एकदा माझ्या दोन चिमुरड्या नाती इतक्या भांडल्या, इतक्या भांडल्या व त्यांनी रडून ओरडून आकाश-पाताळ एक केले; घर डोक्यावर घेतले. मला वाटले, आता दिवसभर एकमेकींच्याकडे फिरकणार नाहीत. दुसऱ्याच घटकेला दोघीज माझ्या गादीवर शेजारी शेजारी बसून घसरगुंडी खेळत होत्या! परमेश्वर ही भांड विसरण्याची साधी कला आम्हाला आमची परत दे. उगीचच प्रौढ म्हणवतो. या लहा नाती माझ्या गुरू आहेत. भांडण उगाळीत बसणारांचे गुरू कोण आहेत ते त्यां त्यांनी पाहावे.

न विसरणे आणि डूख धरणे हा स्वभाव सर्पयोनीचा आहे म्हणून बिचार युगानुयुगे सरपटत राहिली आहे. तिच्या देहाला आणि मनाला उंची, आणि उदात्त यांचा अनुभवच नाही. ही ऐच्छिक देणगी मानवालाच आहे. घेईल त्याला ना!

या चातुर्मास्यात हे एक व्रत घेण्यासारखे आहे. निदान चार महिने ट्रायल. गुण आल्यास पुढे चालू.



# थोरामोठ्यांच्या कथा

भक्त सुदाम्याची गोष्ट. घरचें अठरा विश्वे दारिद्र्य पाहून त्याची बायको अगदीं त्रासली होती. ती एकदां त्याला म्हणाली, "अहो, भगवान कृष्ण तुमचा बाल-मित्र आहे म्हणतां. मग एकदां त्याच्याकडे जाऊन तर या. तो तुमचें हें दारिद्र्य दूर करील. सांगा त्याला." पत्नीनें आग्रहानें त्याला भगवंताकडे पाठवून दिलें. रिकाम्या हातानें जाणें बरें नाहीं म्हणून सुदामा पोह्याची पुरचुंडी बांधून भगवंताकडे गेला.

भगवंतांनीं त्याचे ते पोहे मोठ्या प्रेमानें खाल्ले! त्याला आपल्या आसनावर बसवलें आणि गोष्टी केल्या. परतण्याच्या वेळीं निरोप द्यायला स्वतः गांवाच्या वेशी-पर्यंत आले! परंतु पत्नीनें ज्या कल्पनेनें सुदाम्याला कृष्णाकडे पाठवलें होतें ती गोष्ट त्यानें भेटींत काढलीच नाहीं! त्यामुळें तो रिकाम्या हातानेंच परतत होता. असलेले पोहेहि आतां तो गमावून बसला होता! परततांना तो स्वतःशींच म्हणाला, "प्रभूची माझ्यावर किती कृपा आहे की त्यानें मला भौतिक दान दिलें नाहीं. तें तो देता तर मोहांत पडलों असतों. पत्नीनें मला त्यासाठीं पाठवलें होतें. परंतु परमेश्वराची अपार कृपा कीं त्यानें तसें कांहीं घडूं दिलें नाहीं! कुठली स्थूल वस्तु दिली नाहीं."

असा विचार करीत आनंदानें तो घरीं परतत होता तों स्वर्ग-नगरी दिसली. आपलें घर सोन्याचें झालेलें पाहून सुदाम्याला आश्चर्य वाटलें! घरीं गेल्यावर तो बायकोला म्हणाला, "हें माझें घर दिसत नाहीं. माझें घर दुसरेंच आहे. हें प्रभुचें आहे. तें त्याचें त्यालाच परत करूं द्या."

कांहीं मिळालें नव्हते तेव्हांहि सुदाम्याच्या मनांत भावनाहीच कीं प्रभुची केवढी कृपा! आतां मिळालें तर तो म्हणालाही हि प्रभूचीच कृपां आहे. जें मिळालें तें भोगासाठीं नाहीं मिळालेलें, असा विचार करून तो अनासक्त राहिला,

× × ×

## वेळेचें भान

आपल्या जीवनांतील प्रत्येक गोष्ट वेळेवरच होईल अशी खात्री देतां येत नाहीं. परंतु ज्या ज्या मुख्य क्रिया आहेत, त्यांत जर नियमितपणाचें भान आपण राखलें, तर इतर कामें जीं अधूनमधून येतात, जीं नित्याचीं नसतात, त्यांतहि सहज नियमितपणा येऊन

जातो. झोंपण्याची वेळ, उठण्याची वेळ, जेवणाची वेळ, फिरायची वेळ निश्चित करून टाकली कीं बाकीच्या कामांची वेळ सहज निश्चित होऊन जाते. आणि कामाचा भारहि वाटत नाहीं.

एकदां बापूजी या बाबतींतला आपला अनुभव सांगत होते. त्यांनीं गीतेचा पदार्थ–कोष तयार केला होता. तसा कोष इतरांनींहि केला होता, परंतु बापूंना तें माहीत नव्हते. हें जेव्हां विनोबांनीं त्यांना सांगितलें तेव्हां बापू म्हणूं लागले, "जी मेहनत केली ती कांहीं व्यर्थ नाहीं गेली. तिचा मला लाभच झाला आहे." बापू पुढें सांगूं लागले, "या कोषासाठीं मी रोज वीस मिनिटें देत असे. दुसरीं कामें सोडून देऊन जर ह्याच कामाच्या मागें लागलों असतों तर कदाचित् हें काम लवकर झालें असतें असा कुणाला भास होऊं शकतो. पण तो भासच आहे. अशानें माणूस कंटाळून जाण्याचाहि फार संभव आहे. 'अनासक्तियोग' हि मीं रोज एक श्लोक लिहून पूर्ण केलें. झोपण्यापूर्वी रोज लिहूनच टाकीत होतों. तसें केलें नसतें तर कदाचित् तें काम पूर्ण झालें नसतें."

प्रतिभेच्या कामांत कदाचित् वेळेचें बंधन जमणार नाहीं. परंतु जीवनांतलीं प्रमुख कामें जर वेळेवर केलीं तर जीवनरस वाढतो ही अनुभवाची गोष्ट आहे.

× × ×

## बापूंनीं क्षमा मागितली

बापूंच्याकडून शिफारस–पत्र घेण्यासाठीं एक दंतवैद्य त्यांच्याकडे आला होता. तो बापूंना म्हणाला, "आपल्या आयुर्वेदांत दांत उपटण्याची सोपी युक्ति आहे. मी कुणाचेंहि दांत अगदीं सहज काढूं शकतो. थोडाहि त्रास होणार नाहीं."

विनोबांना त्यावेळीं आपले दांत काढवून घ्यावयाचे होते. बापूंनीं ह्या दंतवैद्याला एका माणसाबरोबर विनोबांच्याकडे पाठवून दिले. भेट झाल्यावर तो विनोबांना म्हणाला, "हलणारे दांत काढतां येतातच. पण मजबूत दांत त्याहून सुलभतेनें निघतात. कारण, ते बोटांच्या चिमटींत योग्य अँगलमधें पकडणें सोपें जातें."

विनोबांनीं विचारलें, "पण काढतांना थोडें दुखत तर असेल?"

तो म्हणाला, "छे; बिलकुल दुखत नाहीं. दुखण्याच्या आधींच तो निघून येतो."

थोडें दुःख सहन करावें लागणार असें मानून विनोबांनीं मनाची तयारी केली ते वैद्याला म्हणाले, "कोणता दांत काढतां? हलणारा कीं पक्का?"

दंतवैद्य म्हणाला, "हलणाराच काढेन."

विनोबांनीं त्याला सांगितलें, "नाहीं, पक्काच काढा."

मग त्या दंतवैद्यानें न हलणारा दांत हिरडीसह धरून जोरानें उपटण्याचा प्रयत्न केला. तो निघाला नाहीं. त्यावेळीं इतक्या तिव्र वेदना झाल्या कीं विनोबांच्या डोळ्यांतून पाणी निघालें आणि डोक्यापासून कानापर्यंत तीव्र ठणका झाला!

दंतवैद्यानें पुन्हां परत करून पाहण्याची परवानगी मागितली. विनोबा वैद्याला म्हणाले, "पुरे झालें. नालायक आहात तुम्ही! आतां बस!"

तो दंतवैद्य तिथून जो निघाला तो सरळ स्टेशनवरच गेला! बापूंना तोंड दाखवायला तो गेलाच नाहीं. तिथें शिफारसपत्र थोडेच मिळणार होतें!

बापूना हा सारा प्रकार कळल्यावर त्यांनीं विनोबाची क्षमा मागितली।

## साईस विनवणी

साईराया आतां–दया यावी चित्ता
निवारावी चिंता–माझ्या हृदयाची।
सदामज दावी–तुझे रूप डोळा
पाहता उमाळा–येई मज।

अन्य मुला चाळा–कशाचा नसावा
धन्य देह व्हावा–तुझे नाम घेता।
मज मरणाचे–नाही नाही भय
परि तुझी सय–सदा राहो।

हातांना या चाळा–सदा असो द्यावा
तुझे चरित लिहिता–हात धन्य व्हावा।
कानाने ऐकावे–सदा या पवित्र
तुझे गुणगान–आणि स्तोत्र।

चालता चालणे–पाय न थकावे
सदा येणे व्हावे–शिरडी ग्रामी।
व्हावेसे वाटले–सार्थक देहाचे
मुखी नाम देवा–येवो तुझे।
इतुकी माझी–तुला विनवणी
संकटी धावावे–साई चक्रपाणी।

—सौ. श्री रहाणे

# स्वामी विवेकानन्दांचा राष्ट्रवाद

लेखक : श्री. आनंद हर्डीकर,

४ जुलै १९०२ याच दिवशीं स्वामी विवेकानंदांचा पार्थिव देह या जगांतून कायमचा निघून गेला. 'प्रत्येक महापुरुष म्हणजे परमेश्वरानें पृथ्वीवर फेंकलेली जळती मशाल होय.' असें कार्लाइलनें एके ठिकाणीं म्हटलें आहे. स्वामीजींच्या रूपानें परमेश्वरानें अशीच एक प्रज्वलित मशाल या आपल्या भारतभूमीवर फेंकली. पौष वद्य ७ संवत् १९१९, शके १७८४, १२ जानेवारी १८६३ रोजी स्वामीजी वंग प्रांतांत जन्मले.

स्वामीजींचें मूळ नांव नरेन्द्रनाथ दत्त. १८८४ सालीं ते पदवीपरीक्षा उत्तीर्ण झाले. लहानपणांतील आडदांडपणाचें किशोरावस्थेंत आणि तारुण्यांत चौकसपणामध्ये रूपांतर झालें. विश्वविद्यालयीन जीवनांत त्यांचा पाश्चात्य आणि पौर्वात्य अशा दोन्ही प्रकारच्या तत्त्वज्ञानांशीं थोडाफार संबंध आला. पण नरेन्द्रनाथ हे संशयवादी, बुद्धिजीवि नि नववास्तववादी समाजाचें प्रतिनिधित्व करीत होते. त्यांच्या प्राध्यापकांना, सुप्रसिद्ध सुशिक्षित महाभागांना, धर्मावर लंबीचौडी व्याख्यानें देऊन स्वतःच्या पांडित्याची शेखी मिरविणाऱ्या, माणूस आणि परमेश्वर यांच्यांत दलाली करूं इच्छिणाऱ्या साधूसंतांना ते विचारीत—

> देव कुणाला भेटे कां हो, आज मला सांगा हो ।
> अस्तित्वाची खूण दाखवा, एकच ठायी मजला हो ॥

पण सर्वांकडून स्तब्धता हेंच उत्तर मिळत असे; ते सर्व अवाक होत. पण शेवटीं तोहि दिवस उजाडलाच कीं ज्या दिवशीं या बुद्धिमान् माणसाला मार्गदर्शन करूं शकेल अशा एका कालिमातेच्या पुजाऱ्याशीं या तरुणाची भेट झाली. एका मानवाची त्याला महामानवपदाप्रत नेऊन पोंचविणाऱ्या विधात्याशीं झालेली भेट होती ती !

नरेन्द्रनाथ प्राचार्य विल्यम हेस्की यांच्या सांगण्यावरून दक्षिणेश्वरीं असलेल्या कालिमातेच्या देवळांत श्रीरामकृष्ण परमहंस यांना भेटण्यासाठीं गेले. मस्तक आपोआपच नत झालें. नरेंद्रनाथांचा आत्मा रामकृष्णांच्या आत्म्याशीं तल्लीन होऊं लागला. त्याच क्षणीं, अगदीं त्याच क्षणीं, आपली भारतीय संस्कृति शतकानुशतकांची राख झाडून हिंदुत्वाच्या अस्मितेचे नवअंगार, नवस्फुल्लिंग चेतवीत नरेन्द्रनाथांच्या चारित्र्यांत समाविष्ट झाली. त्यांनीं श्रीरामकृष्णांना विचारलें 'तुम्हीं परमेश्वर पाहिला आहे कां?'

तावडतोब उत्तरले. 'होय नरेन, मी परमेश्वर पाहिला आहे. तुझीहि जर तीव्र इच्छा असेल तर तो मी तुला दाखवीन.' या उत्तरानें नरेन्द्रनाथांचा सारा संशय दूर झाला. याचें समाधान झालें आणि त्यांनीं रामकृष्णांचें शिष्यत्व पत्करलें. श्रीरामकृष्णहि आपलें कार्य पुढें चालू ठेवील असा सत्‌शिष्य मिळाल्यानें निश्चित झाले. नंतर नरेन्द्र-गुरुपदेशाप्रमाणें दिव्य साधना करून दिव्य आत्मज्ञान मिळविलें. ते रामकृष्णाच्या आध्यात्मिक वाटचालींतील शिष्यश्रेष्ठ ठरले. १६ ऑगस्ट १८८६ या दिवशीं रामकृष्ण परमहंस महासमाधिस्त झाले. त्यानंतर नरेन्द्रनाथांनीं कोट पाटलोन फेकून दिली, कफनी धारण केली.

संन्यास घेतला आणि 'स्वामी विवेकानंद' झाले. केवळ वैयक्तिक मुक्तीसाठीं यत्न न करतां हिंदुधर्माचें नवजागरण करणें हें रामकृष्णांनीं योजलेलें कार्य विवेकानंदांना पूर्ण करावयाचें होतें. यासाठीं रामकृष्णांनीं स्वामीजींना देहभूमिकेवर राहण्याचा आदेश दिला होता. 'ज्यावेळीं हें महान कार्य संपेल त्यावेळीं तूं आत्मिक पातळीवर जा. त्यानंतर तूं म्हणशील तेव्हां तूं या जगाचा निरोप घेऊं शकशील.' असें गुरुदेव त्यांना म्हणाले होते. 'मी देशाची सेवा करीन', अशी संन्यासधर्माची दीक्षा घेतांना त्यांनीं शपथ घेतली होती. या सर्वांची आठवण ठेवून त्यांनीं आपल्या ज्ञानि–धर्म–देशबांधवांचा जास्तींत जास्त परिचय करून घेणें हाच कार्याचा पहिला टप्पा ठरवला. कारण त्या काळांत भारतमाता हीच कालिमाता होती आणि लोकसेवा हीच कालिमातेची सेवा होती; म्हणून स्वामीजींनीं त्यानंतर निष्कांचन स्थितींत अयाचितवृत्तीनें सर्व भारताचा प्रवास केला. भारताच्या दक्षिणाग्री असलेल्या एका खडकावर एकदां असेच ते बसले होते. हिंदी महासागर, अरबी समुद्र आणि बंगालचा उपसागर या तिहींचें जल एकत्र होतानांचा देखावा पाहून त्यांचें भान हरपलें. त्यांची समाधि लागली.

अनादि–अनंत अशा परमात्म्याचा साक्षात्कार त्यांना झाला. परमात्म्यानें त्याच्या या लाडक्या जीवात्म्याला स्वधर्म नि स्वदेश यांच्या उन्नतीसाठीं परधर्मीय परराष्ट्रांत जावयाचा आदेश दिला. विवेकानंदांनीं अमेरिकेंत जावयाचें ठरविलें. इसवी सन् १८९३ सालीं अमेरिकेंत सर्वधर्म परिषदेसाठीं हिंदुधर्मप्रतिनिधि म्हणून ते गेले. श्रद्धा-वान् मूर्तिपूजक संस्कृतीचे ते प्रतिनिधि होते. त्यांनीं तिचें माहात्म्य सुवर्णपूजक संस्कृतीला पटवून देण्याचें ठरवलें. तेथें हिंदुधर्माचें तत्त्वज्ञान सर्व श्रेष्ठ नि अप्रतिम आहे हें सिद्ध करून त्यांनीं दिग्विजय मिळविला. आपल्या अमोघ वक्तृत्वाच्या जोरा-वर त्यांनी हें दाखवून दिलें कीं, 'खरा धर्म करणात्मक–Positive–आहे; अकरणात्मक –Negative–नाहीं. असत्य, अनृत यांपासून परावृत्त होणें म्हणजेच धर्म नसून सत्य–सनातनाच्या समृद्धीसाठीं सतत प्रवृत्त असणें म्हणजेच धर्म आहे. या जगांतील सर्व धर्म म्हणजे एकाच सत्य नि चिरंतन धर्माची वेगवेगळी स्वरूपें आहेत. एकांतच

अनेकत्व असतें. म्हणून धर्मवेड्या कूपमंडूकवृत्तीचा आग्रह न धरतां सर्वगुणसंपन्न सर्वसाक्षी, सर्वशक्तिमान् नि सर्ववादसमत अशा विश्वधर्माची कास धरली पाहिजे. थोड्याच कालावधींत सर्व पाश्चिमात्य जगांत स्वामी विवेकानंदांचें नांव सुप्रसिद्ध झालें. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स इत्यादि देशांत त्यांनीं हिंदुधर्म, हिंदुसंस्कृति आणि इत अनेक विषयांवर व्याख्यानें दिलीं, नि अद्वैतांचें माहात्म्य, आत्मिक सामर्थ्य विश करून सांगितलें. पण हें सारें धर्मप्रातीनिधींचें कार्य करीत असतांनाच एका राष्ट्र प्रतिनिधीच्या नात्यानेहि त्यांनीं व्यापासच्या उभ्याआडव्या धाग्यांनीं विणलेलें व म्हटलें. समशीतोष्ण, डोंगराळ, विस्तीर्ण प्रदेश हा तिचा माग, विविध वंशांच्य मिश्रणांतून निर्माण झालेली युद्धपिपासू प्रजा म्हणजे तिचा कापूस तर युद्ध म्हण तिचा धोटा! शस्त्र हेंच साधन आणि इह–परलोकीं सुखप्राप्ति हेंच ध्ये असणाऱ्या युरोपिनांना त्यांनीं स्पष्टवक्तेपणानें सांगितलें कीं, 'स्वतःच्य जीवनासाठीं इतर राष्ट्रांचा उच्छेद करणें हा तुमचा उद्देश पाशवी आहे. तुम्हांला त्य राष्ट्रांतील संपत्तीची अन्याय्य हांव आहे तर आमच्या भारतीय संस्कृतीला सुख–दुःख सामर्थ्य–दुर्बलता, श्रीमंती–दारिद्य, आनंद–विषद, हास्य–अश्रु, जीवन–मृत्यु इत्यादि प्रबल आघाता–प्रत्याघातांतून मानवी हृदयांत उगम पावलेल्या अनंत शांतीची ओ आहे! त्या शांतीच्या दुर्दम्य मनोबलामुळेंच, शतकानुशतकें प्रहार सहन करून, शेकडो परकी आक्रमणें पचवून आजतागायत आमचा भारत खंबीरपणें उभा आहे. आत्मा अविनाशी, अनादि–अनंत असतो. आमचा देश तसाच अमर आहे आणि अशा भाग्यवान्–श्रद्धावान् भारतभूमीचे आम्ही सुपुत्र आहोंत!' स्वामी विवेकानंदांनीं परखंडांत काढलेल्या या उद्गारांमुळें हिंदु धर्मांत नवचैतन्य निर्माण झालें नि भारतीय संस्कृति एखाद्या देदिप्यमान् विद्युल्लतेप्रमाणें चमकूं लागली. जागतिक दिग्विजय करून मातृभूमीकडे परतलेल्या स्वामीजींचें भारतीय जनतेनें ठिकठिकाणीं अतिप्रचंड नि उत्स्फूर्त स्वागत केलें. त्यांची अशी ठाम धारणा होती कीं, परमेश्वराची अवकृपा झालेल्या, जीवनाची धूळधाण उडालेल्या, सारासार विवेक नष्ट झालेल्या, पददलित, भूकेकंगाल, मांडखोर नि मत्सरी अशा भारतीय जनतेवर कुणी अंतःकरणापासून प्रेम केलें तर हा देशहि पुन्हां जागृत होईल. जेव्हां हजारों थोर अंतःकरणाचे स्त्रीपुरुष, विलासाचा त्याग करून अज्ञान व दारिद्याच्या भयानक भोवऱ्यांत अडकलेल्या कोट्यावधि देशबांधवांच्या कल्याणार्थ अविश्रांत परिश्रम करण्यास बद्धपरिकर होतील तेव्हांच भारत जागृत होईल. म्हणूनच त्यांनीं भारतीयांना सर्वप्रथम हाच आदेश दिला कीं, 'तुम्ही भारतीय आहात याचा अभिमान धरा. प्रत्येक भारतीय हा तुमचा बांधव आहे; भारतीयता हें तुमचें जीवन सर्वस्व आहे. लहानपणी तुम्हांला कटिखांद्यावर घेणारा, तारुण्यांत तुमच्या सुखऐश्वर्यांचा

मोहोर फुलविणारा हा भारतीय समाज हीच तुमची वार्धक्यांतील काशीहि आहे! तेव्हां निर्भय-सबल पुरुष सिंह बना! नि राष्ट्राच्या प्रगतीसाठीं सर्वस्व समर्पण करण्याची तयारी करा!'

स्वामीजी हिंदुधर्मावर अधिष्ठित अशा प्रखर राष्ट्रवादाचे प्रवर्तक होते. त्यांचा राष्ट्रवाद मोळसट, भोंदू नव्हता. स्वामीजींच्या पराकोटीच्या स्वधर्म नि स्वराष्ट्राभिमानांतून त्यांचा राष्ट्रवाद निर्माण झाला होता. तो दुसरीं राष्ट्रें मारणारा नव्हता, तर दुसऱ्या मृत्युमुखीं पडलेल्या राष्ट्रांच्या मदतीला तत्परतेनें धांवून जातां येईल इतपत स्वराष्ट्राला समर्थ बनविणारा राष्ट्रवाद होता.


न तन सेवा, न मन सेवा, न जीवन और धन सेवा।
हमें है इष्ट जनसेवा, सदा सच्ची भुवनसेवा॥

हें त्यांच्या त्या सर्वंकष राष्ट्रवादाच्या पताकेवर कोरलेलें ब्रीदवाक्य होतें. स्वामीजींनीं अमेरिका-युरोपला दिलेल्या दोन भेटींचा, तेथील त्यांच्या कांहीं भाषणांचा नि त्यांनीं दीक्षा दिलेल्या अनेक अमेरिकन-ब्रिटिश-फ्रेंच-रशियन शिष्यांचा उल्लेख करून ते विश्वबंधुत्ववादी होते असें मानण्यांत येतें. तें खरेंहि आहे. 'जगांतील बऱ्याच भाषांतून देव या अर्थाचे दोन अक्षरी म्हणजेच समान अक्षरी शब्द उपलब्ध आहेत. संस्कृत : देव, ऊर्दू : अल्ला, इंग्लिश : लॉर्ड, हिब्रू : जन्ह, लॅटिन : डयूस, फ्रेंच : डॉयू, जर्मन : गोड, डॅनिश : गोघ, पर्शियन : सोरू, स्वीडिश : गोथ, ग्रीक : झ्यूस, वायकिंग : थॉर, इंका : पापा, जपानी : शिन, सिरियन : इल्यू, स्पॅनिश : डौश इत्यादि! ही वस्तुस्थिति असतांना जगांत सर्ववादसंमत सर्वसमष्टिस्वरूप असा विश्वधर्म कां बरें निर्माण होऊं शकणार नाहीं?' असें त्यांनीं विचारलें होतें नि विश्वधर्मांची-राज्याची कल्पना उल्लेखिली होती. पण 'स्वसंतुष्ट राष्ट्रवादावरच विश्वबंधुत्ववाद अधिष्ठित असावा लागतो.' असें लॉईड जॉर्जनें म्हटलें आहे, त्याचप्रमाणें स्वामीजी प्रथम राष्ट्रवादी होते नि नंतर विश्वबंधुत्ववादी होते. त्यांचा राष्ट्रवाद श्रद्धामूलक होता. ते म्हणत-'सांजाची चव खाल्ल्यानेंच समजेल, साखरेची गोडी चाखूनच पाहिली पाहिजे. तद्वतच सारें ज्ञान-तत्त्वज्ञान श्रद्धेनेंच आत्मसात केलें पाहिजे. 'आम्ही धीर आहोंत' अशी श्रद्धा ठेवा कीं तुम्ही धीर व्हाल; 'आम्ही ऋषि आहोंत अशी श्रद्धा बाळगा कीं तुम्ही खरोखरच महान् ऋषि बनाल! येशू ख्रिस्तासारखे सहृदय बना म्हणजे तुम्ही ख्रिस्त व्हाल; भगवान बुद्धाप्रमाणें भावनाशील बना म्हणजे तुम्ही बुद्ध बनाल! भावनाप्रधान श्रद्धा हेंच जीवन, सामर्थ्य, चैतन्य आहे! श्रद्धेशिवाय बुद्धीची कितीहि कसरत केली तरी परमेश्वरप्राप्ती होणार नाहीं!' असें श्रद्धेचें महत्त्व वर्णन करूनच स्वामीजी थांबले नाहींत तर त्यांनीं कोठल्या देवावर कशी श्रद्धा ठेवावी हेंहि स्पष्ट करून सांगितलें.

त्यांनीं आपल्या हिंदुभूमीलाच सर्वांची देवता ठरवली. तेंच खरें जागृत दैवत आहे. युगानुयुगें सर्व जगाला संस्कृतीच्या पैलतीराला नेऊन अनेक वैभवशाली रत्नांनीं सुशोभित करणाऱ्या, लाखों जीवांना दुःखांतून सोडवून मुक्तीचा मार्ग दाखवणाऱ्या या राष्ट्रदेवतेचें दुःख आपण साऱ्यांनीं आपल्या हृदयांतील रक्ताचें अर्घ्य देऊन दूर केलें पाहिजे, असा त्यांचा संदेश होता. भारतीय समाज सर्वसंहारक, प्रलयंकारी अशा जगन्मातेला, नररुंधारी कालिमातेला विसरला मृत्युमयी मातेला घाबरला म्हणूनच मनुष्यत्वहीन, पराक्रमहीन, वीर्यहीन होऊन बसला. आपणांला पुन्हां शक्तिसंपन्न व्हायचें असेल तर करालदंष्ट्रा, असुरमर्दिनी अशा आपल्या मातेला शरण गेलें पाहिजे. स्वामीजी एका कवितेंत म्हणतात—

"Who dares misery love.
 And hug the form of death,
Dance in Destruction's dance.
 To him the mother come!"

—पुरुषार्थवरून साभार



# शिक्षण म्हणजे सत्संगति

—संत विनोबा

भक्ताच्या ठिकाणीं योग सहज असतो. कारण, हरिमयतेत निर्विषयता येऊनच जाते.

वस्तूंतून तिचे सर्व गुण–दृष्ट, अदृष्ट–वजा केले तर शिल्लक काय राहते ?

एक म्हणतो, 'शून्य'
दुसरा म्हणतो, 'विशेष'
तिसरा म्हणतो, 'अज्ञेय'

योगाचें सार—१ यम, २ नियम, ३ संयम.

व्यक्तीचा 'अहं' समष्टीच्या 'अहं' मध्यें लीन झाल्यानंतरच ईश्वराला अर्पण होऊं शकतो. आधीं मग समर्पण.

ज्ञान अगदीं जुनें उत्तम, उपासना अगदीं शेवटची उत्तम.

आहार्य अन्नाची वृत्तिभेदाने त्रिविध परिणति होते; लैंगिक, प्राणिक आणि आत्मिक.

अर्थ, समाज इत्यादि सामाजिक शास्त्रें नियामक नाहींत, नियमित आहेत. मी त्यांना जो नियम लावीन तो स्वीकारणें त्यांना भाग आहे.

पाणी आपण होऊन मला बुडवूं शकत नाहीं. मी पाण्यांत पडेन तरच बुडवूं शकलें. तेंहि मी पोहत असेपर्यंत बुडवूं शकत नाहीं, माझें पोहणें थकल्यानंतर बुडवूं शकते. तेंहि माझी 'देहबुद्धि' असेल तर बुडवूं शकते. एरवी बुडवूं शकत नाहीं. याचें नांव 'आत्म–स्वातंत्र्य'

संत कोण ? माझ्यातला विशिष्ट दोष मला ज्याच्यांत दिसत नाहीं किंवा अल्प दिसतो, तो मला संत. ह्याहून अधिक विचार करण्याचें मला कारण नाहीं.

'संत् ब्रह्म' सिद्ध होतें. 'चित् ब्रह्म' लक्षांत येतें. 'आनंद ब्रह्म' डोळ्यांत भरतें. १ विश्व, २ जीव, ३ संत.

अकर्तृत्वाचे प्रकार—१ कर्मत्व, २ निमितत्व, ३ साक्षित्व.

देहांत मोक्षाची शक्यता आहे, पण संभव नाहीं.

कर्मयोगाचें यंत्र सख्त राखावे. घर्षणाच्या भीतीने ढील करूं नये. घर्षण टाळण्यासाठीं भक्तीचे तेल द्यावे.

अधर्म, परधर्म, उपधर्म ह्या तीन आडवाटा टाळून साधकानें स्वधर्म आचरावा.

कर्मयोगांत काल-नियमन कर्म-नियमन आणि कल्पना नियमन आवश्यक आहे.

हेतु, परिणाम आणि स्वरूप हीं तिन्ही पाहून कर्मांची योग्यता ठरवायची.

देहांधतेमध्यें दोन दोष आहेत. ( १ ) बहिर्मुखता आणि ( २ ) संकुचितता. बहिर्मुखतेमुळें आंतला देव अंतरतो. संकुचिततेमुळे दुनिया दूर होते.

साधुत्वाची द्विरूप प्रवृत्ति असते. कधीं संग्राहक कधीं संशोधक. संग्राहक साधुत्व पूर्वानुभवांचा समन्वय करतें. संशोधक साधुत्व नवीन आविष्कार करतें.

'शिक्षण म्हणजे सत्संगति' ह्याहून निराळी शिक्षणाची व्याख्या मी करूं शकत नाहीं.

माझ्या धर्मांत उपासना ऐच्छिक आहे आणि म्हणून अनिवार्य आहे,

ममत्व-बुद्धीचें मर्मस्थान हें कीं तिच्या योगानें मनुष्य आपली सार्वभौम सत्ता गमावून बसतो.

उपासना म्हणजे देवाच्या जवळ बसणें, म्हणजेच बसल्या जागीं देवाला आणणें.

आधीं जग कसें आहे तें पहावयाचें, मग त्यावरून सिद्धान्त ठरवावयाचा- ही वैज्ञानिक विचार-पद्धति समाधींत सिद्धान्त स्फुरला, आतां जग तसें असावयाला बांधलेलेंच आहे-ही आध्यात्मिक निर्विचार पद्धति.

पुरुष दिव्यासारखा आहे. वीर्य तेलाच्या जागी आहे. प्राण वात आणि प्रज्ञा ज्योत.

'दिव्या दिव्या ! नमस्कार.'

———

# श्रीशंकराचार्य चरित्र

## श्री दासगणु महाराजांनीं कसें लिहिलें !

मध्वाचार्यांचें संप्रदायी एकनिष्ठ वैष्णव शेषाचार्य अनवणे हे बीड येथें राहणारे गृहस्थ श्री दासगणू महाराजांविषयीं आदर बाळगणारे होते. पंढरपुरास आले कीं ते महाराजांच्या भेटीस अवश्य येत असत. मध्वाचार्यांचें चरित्र मराठींत काव्यरूपांत असावें, हा त्यांच्या मनांतील फार दिवसांचा हेतु होता. एकदां त्यांनीं महाराजांनाच तें चरित्र लिहिण्याची विनंति केली. ही मध्वाचार्यांची सेवाच आपल्या हातून घडते आहे, या भावनेनें महाराजांनी तें काम आनंदानें पतकरलें. कांही वैष्णव मंडळींच्या आग्रहीपणामुळें मात्र महाराजांना थोडा ताप झाला. नमनामध्यें अमुक एक उल्लेख करूं नका, असें ते म्हणाले. महाराज तें मानीनात. तेव्हां अनुक्रम तरी निदान आम्ही सांगतों तसा ठेवा, हें त्यांचें म्हणणें मानून काव्यलेखनास आरंभ झाला. पुढें एका प्रसंगीं शंकराचार्य हे मणिमान नांवाच्या दैत्याचा अवतार आहेत व त्यांनीं मोहशास्त्रें निर्मिलीं असा उल्लेख मध्वचरित्रामध्यें आला. संस्कृतांतील मध्वचरित्र एका पंडितानें वाचून त्याचा अर्थ सांगावा. तदनुरोधानें महाराजांनीं ओंव्या रचाव्या व कोणी तरी त्या लिहून घ्याव्या अशी ग्रंथलेखनाची रीत होती; परंतु हें मणिमान दैत्याचें प्रकरण महाराज लिहिण्यास तयार होईनात. ते म्हणाले,

"मी शंकराचार्यांचा अनुयायी आहें. तुम्ही काय वाटेल तें म्हणूं शकतां; पण मी माझ्या तोंडांतून तसा उच्चार करणार नाहीं."

"आपणांस नुसता अनुवाद करणें आहे. त्यांत अडचण कसली ?"

"अहो, अनुवादांत तरी माझ्या आईला दिलेल्या शिव्या मीं उच्चाराव्या काय ?"

शेवटीं या उल्लेखावांचूनच महाराजांनीं सर्व ग्रंथ पुरा केला, पण त्याच वेळीं श्रीशंकराचार्यांचें चरित्र आपण लिहावें आणि त्यांची योग्यता किती थोर होती हें मराठी वाचकांच्या प्रत्ययास आणून द्यावें असा त्यांचा निश्चय झाला.

पुढें एकदां मध्वसांप्रदायांतील एक अधिकारी पुरुष पंढरपुरास आले होते. मध्वाचार्यांचें चरित्र महाराजांनीं लिहिलें आहे, तें कळल्यावरून भेटीची इच्छा त्यांनीं व्यक्त केली. महाराज भेटावयास हार घालून नारळ पुढें ठेवून त्यांनीं नम्रतापूर्वक नमस्कार केला. ते महाराजांना येऊन म्हणाले, "फार सरस उतरलें आहे आपण लिहिलेलें मध्वचरित्र. आपण मतानुयायी नसून फार प्रेमानें आपण ग्रंथ लिहिलांत. आतां काय चालले आहे ?"

"शंकराचार्यांचें चरित्र लिहिण्याच्या विचारांत आहे."

आश्चर्यचकित झाल्यासारखें होऊन स्वामी म्हणाले, "अमृत प्याल्यावर ही विषाची इच्छा!"

श्रीदासगणू महाराज त्यावर चटकन म्हणाले, "तसें नाहीं स्वामी. मध्वचार्यांचें चरित्र मी लिहिलें, त्या पुण्यानें आतां मला शंकराचार्यांचें चरित्र लिहिण्याची ही इच्छा झाली आहे."

या प्रश्नोत्तरांमध्यें महाराजांच्या वृत्तींतील समन्वयशीलतेचा सुरेख प्रत्यय येतो आपलें यत्किंचितुहि न सोडतां सर्वपक्ष संप्रदायाशीं कसें मिळतें घ्यावें, हें त्याचेजवळ शिकावें. यानंतर लगेच श्रीशंकराचार्यचरित्र सर्वांगपरिपूर्ण व्हावें, या उद्योगास ते लागले. महाराज त्यावेळीं पुण्यास होते विद्वत्तेचें माहेरघर असलेल्या या ठिकाणीं संदर्भ-पडली नाहीं. मराठी, संस्कृत आणि कांहीं इंग्रजी ग्रंथसुद्धां त्यांनीं जमविले. सर्व पुस्तकें वाचून घेतलीं. मराठी पुस्तकांतील कांहीं भाग स्वतः वाचला. नंतर विद्यारण्यविरचित 'शांकरदिग्विजय' हा काव्यमय संस्कृत ग्रंथ प्रधान मानून श्रीशंकराचार्यचरित्र लिहिण्यास आरंभ झाला. महाराजांचें राहणें त्या वेळीं आनंदाश्रमासमोरील श्री. महाजनींच्या वाड्यांत श्री. लक्ष्मीबाई जोगळेकर यांचे बिऱ्हाडीं होतें.

चरित्र लेखक अनंतराव आठवले पुढें म्हणतात—

हें काम करीत असतांना आम्ही भोंवतालचे लोक खरोखरीच दमून जात असूं. मधून मधून आम्हांस कंटाळा येई. पण ८० च्या घरांतील श्रीदासगणू महाराजांच्या उत्साहांत कधीं न्यून पडलें नाहीं. सकाळ-पासून निरनिराळे ग्रंथ पाहणें, समोर असेल त्या मनुष्याकडून वाचून घेणें, संस्कृत किंवा इंग्रजीसारख्या भाषेंतील लिखाणांचा अर्थ जाणत्याकडून समजून घेणें, बौद्ध, जैन, बौद्ध, रामानुज, निंबार्क, शाक्त, सांख्य इत्यादींच्या तत्त्वज्ञानांचा उल्लेख करतांना त्या त्या मतसंस्थापकांच्या चरित्रविषयक वा तत्त्वज्ञानविषयक ग्रंथाचा परिचय करून घेणें, निरनिराळ्या विरोधी मतांचा ऊहापोह करणें इत्यादि अभ्यास सतत चालू असे. विष्णु सहस्रनामाचे बारा पाठ, आल्यागेल्याशीं बोलणें, कोणी आलें तर आख्यानांचें वाचन हे कार्यक्रम तर नेहमीं चालूच असत, पण या सर्वांहूनहि वेळ काढून श्रीशंकराचार्य चरित्राचें काव्यमय लेखन अखंड चालूच होतें. स्फूर्तीची वाट बघत कधीं थांबावें लागलें नाहीं. ती त्यांच्यापुढें जणूं हात जोडून उभी होती.

हें सर्व पाहिलें कीं, जिव्हाळ्याची प्रीति किती कार्यक्षमता उत्पन्न करूं शकते, तें प्रत्ययास येई. या आचार्यचरित्रासंबंधीं ह. भ. प. सोनोपंत दांडेकर प्रस्तावनेंत म्हणतात. "या अशा अलौकिक पुरुषाचें चरित्र श्रीदासगणूंनीं मोठ्या परिश्रमपूर्वक लिहिलें

आहे. त्यांनीं लिहिलेलीं मध्वाचार्य, शेगांवकर श्रीगजाननमहाराज यांचीं चरित्रें प्रसिद्ध झालीं आहेत. या सर्व चरित्रांवरून असें दिसून येतें कीं, चरित्र लिहिण्यापूर्वी चरित्रनायकासंबंधीं शक्य तितकी माहिती मिळविण्याची खटपट ह. भ. प. श्रीदासगणू महाराज करतात. चरित्रनायकाचे ग्रंथ वाचतात. अवश्य अशा मुख्य ठिकाणीं जाऊन येतात. मगच चरित्र लिहितात. या चरित्राकरितांहि कांहीं संस्कृत चरित्रें, मतामतांचे ग्रंथ वाचले. मठांचे इतिहास वाचले. प्रवास केला. मगच हें चरित्र लिहिलें. उतार वयांतहि श्रीदासगणूंच्या ठिकाणीं चरित्रलेखनाकरितां अभ्यास करण्याची ही जी प्रवृत्ति दिसून येई, ती तरुणांनीं अनुकरण करण्याजोगी नाहीं असें कोण म्हणेल ? त्यांनीं आचार्यमान्य अशा अद्वैताचा पुरस्कार केला, पण अद्वैताच्या नांवावर चाललेला घोंधळ त्यांना नको होता. अद्वैताबरोबर कर्म, वासना, ज्ञान अशा सर्वांची अधिकारपरत्वें आवश्यकता आहे, असें त्यांचें मत आहे." असो.

ह. भ. प. दांडेकर महाराजांनीं श्रीशंकराचार्य चरित्राकरितां जें लिहिलें तें त्यांच्या इतर ग्रंथांच्या बाबतींतहि खरें आहे. या श्रीशंकराचार्य चरित्राच्या प्रकाशनाच्या बाबतींतहि विशेष गोष्ट घडली आहे. ग्रंथ पाहून एका तत्वज्ञानप्रेमी श्रीमंत गृहस्थानें मी हा छापीन, म्हणून सांगितलें. त्याप्रमाणें मुद्रणास आरंभ झाला. एक दोन अध्याय छापूनहि निघाले तोंच ज्यांनीं आश्वासन दिलें होतें, त्यांनीं पत्र पाठविलें कीं, व्यापाराच्या अडचणीमुळें मला सध्यां तरी कांहीं मदत करतां येणार नाहीं. मोठी पंचायतीची वेळ आली होती, परंतु एकदां पुढें टाकलेलें पाऊल मागे घेणें महाराजांच्या स्वभावांतच नाहीं. श्रीशंकराचार्य चरित्र प्रसिद्ध झालेंच पाहिजे, असें त्यांनीं ठरविलें. कारण ते म्हणतात. "या सद्गुरू चरित्राचें। श्रवण अवघ्यास व्हावें साचें। हेंच ग्रंथरचनेचें । आहे मूळ प्रयोजन ॥" पुढें ते म्हणतात, "चरित्र अवघें तयार झालें । छापण्याचें कोडें पडलें । दारिद्र्याच्या सदनीं आले पाहुणे सम्राट भूपती ॥ हें जगद्गुरूचें चरित्र भलें । ज्यासाठीं लेखन केलें। तें मनोगत राहिलें । माझे मनींच्या मनांत ॥ तो हेतु हाच होता । ज्यांनीं वाहिली समाजचिंता । ज्यांनीं स्थापिलें अद्वैत मता । करण्या जगाचें कल्याण ॥ त्या जगद्गुरूचें चरित्र । अवघ्या कळावें इत्थंभूत । आणि जगद्गुरूच्या चरणीं सत्य । अतुल श्रद्धा वाढावी ॥ जी श्रद्धा वाढल्यावरी । कल्याण होय सर्वतोपरी —"

अर्थात् काय वाटेल तें झालें तरी ग्रंथ प्रकाशित करावयाचाच, या निश्चयानें त्यांनीं आपल्या परिचितांपैकीं कांहीं मंडळींना ग्रंथाच्या छपाईकरितां साहाय्य करण्याविषयीं पत्रें धाडलीं. त्याप्रमाणें अनेकांनीं मोठ्या आनंदानें रुपये पाठवून ग्रंथ प्रसिद्ध केला.

# उद्धवचिद्धन

धारूरचा उद्धवचिद्धन या नांवाचा साधु कीर्तन करीत करीत अनेक देश हिंडत होता. तो परम भाविक असून सदोदीत हरिभजनांत निमग्न असे. एका पाड-व्याच्या दिवशीं बेदरशहरीं त्याचा मुक्काम पडला. त्या दिवशीं नगरामध्यें त्यानें कीर्तन आरंभिलें. कीर्तन श्रवण करण्याकरितां पुष्कळ पंडित, सज्ञान लोक जमले. त्याचप्रमाणें हरेक जातींच्या लोकांचीही कथेला गर्दी जमली. त्याच्या प्रेमभरित कीर्तनानें सर्वांचें चित्त समाधान पावलें. सर्व शहरांत प्रत्येकाचे घरीं त्याचें कीर्तन करवावें असा गांवच्या मंडळींनीं विचार चालविला. पण रामनवमी जवळ आल्याकारणानें रामजयंतीकरितां आपल्याला धारूरास गेलें पाहिजे असें सांगून उद्धवचिद्धन गांवकऱ्यांच्या मनाचा भंग करूं लागला. लोकांनीं पुन्हां आग्रह करून तेथेंच रामनवमीचा उत्सव करण्याबद्दल त्यांच्याजवळून वचन घेतलें.


एक मोठा प्रशस्त वाडा पाहून तेथें मंडप देण्यांत आला. मंडपामध्यें मखर उभारून त्यांत रामचंद्राची मूर्ति बसविली. शेकडों हरिदासांना बोलावून आणून त्यांचीं कीर्तनें सुरूं झालीं. नाना प्रकारची पक्वान्नें करून ब्राह्मणसंतर्पण होऊं लागले. एकदां दिंड्या, पताका उभारून व वाजंत्री लावून सर्व वैष्णव वीरांची मिरवणूक निघाली. मोठ्या आनंदाच्या भरांत ती मिरवणूक थाटानें एका मशिदीवरून चालली. त्यावेळीं त्या मशिदींत पांचशें मुसलमान बसले होते. हरिदासांची विटंबना करावी या हेतूनें ते सर्व यवन मशिदींतून बाहेर आले. त्यांनीं पताका हिसकावून घेतल्या. शेणमार केली आणि सर्वांना चोप दिला. त्यांच्या विण्याच्या तारा तोडल्या; व मृदंग फोडून टाकिले आणि ते चालते झाले. मिरवणुकींतील सर्व लोकांच्या मनास विक्षेप होऊन तेही दुःख करीत आपल्या घरीं गेले.

या मिरवणुकीबरोबर उद्धवचिद्घन नव्हता. मिरवणूक परत येतांच मशिदी-जवळील सर्व प्रकार त्याला कळला. दुधामध्यें मीठ पडलें म्हणजे तें जसें नासते, स्वयंपाकाला कुत्रें शिवलें असतां जशी स्वयंपाकीण तळतळते, वधुवरांचें घास देणें चाललें असतां पतंगानें समई विझविली म्हणजे विहिणीचें अंतःकरण जसें विक्षेप पावतें त्याप्रमाणें दासविडंबन ऐकतांच उद्धवचिद्घन शोकाकुल झाला. तो लागलीच राममूर्तिपाशीं जाऊन म्हणाला, "रघुनाथा, तुझ्या मनांत जर हा उत्सव नको होता तर आम्हांकडून इतका खटाटोप कशाला करविलास? तूं विश्वात्मा असून सर्वांच्या हृदयास वास करितोस. एतदर्थ तुझ्यावरच विसंबून मी या संतांच्या अपमानाबद्दल खेद करीत नाहीं।

इतकें बोलून त्यानें रामचंद्राची मूर्ति उचलून देव्हाऱ्यांत ठेविली. मखर मोडून टाकिलें आणि मंडपही काढविला. नंतर हरिदासांना नमन करून तो रामभजन करूं लागला.

आपल्या स्वामीचा उत्सव करणाऱ्या भक्तजनांच्या छळामुळें मारुती क्रोधायमान झाला. तो सबंध बेदर पालथें घालण्यास सरसावला. तो त्या मशिदीवर आरूढ होऊन तिच्या भिंती गदगदा हलवूं लागला. ती गोष्ट जवळच्या झोपडींतून एका फकिराने पाहिली. तो फकीर ज्ञानी असल्यामुळें त्याला मारुतीच्या क्षोभाचे कारण समजलें. तो फकीर लागलीच तेथें येऊन हात जोडून मारुतीची प्रार्थना करूं लागला कीं, "हे बलभीमा, नजीकच माझी झोंपडी आहे; तिचें त्वां संरक्षण केलें पाहिजे." फकिराचें बोलणें ऐकून टवाळांनी त्याला वेडा ठरविलें. त्यांनीं फकिरास कोणाशीं भाषण केलेंस म्हणून विचारिलें. त्याने एका वानराची हकीगत सांगून त्यांस तेथून पळून जाण्याची सूचना केली. त्यापर ते गुंड बोलले, "ही मशीद चिरेबंदी आहे. ही वानराच्या बापाला तरी हलेल कां?" त्यांची ही गर्वोक्ति ऐकतांच हनुमान जास्तच संतापला. त्याने पुन्हां ती मशीद जोरानें हालवून पाडून टाकिली. सर्वत्र हाहा:कार उडाला. कांहीं यवन घाबरून सैरावैरा पळत पळत यवनवाड्यापाशी गेले. कांहीं गुंड तेथेंच चेंगरून मेले. जे बातमी सांगावयास धावले त्यांच्या पोटांत शूळ उत्पन्न झाला. हा प्रकार पाहून तो फकीर बादशहाकडे गेला आणि म्हणाला, "उद्धवचिद्घन नांवाच्या भक्ताचा छळ झाल्याचें हें प्रायश्चित्त आहे."

*********



# श्रद्धावान् लभते ज्ञानं

## ( लेखांक २ रा )

लेखक : श्री. केशवराव कृ. प्रधान

मागील लेखात श्रद्धावान माणसाच्या शरीर, मन बुद्धीचा; श्रद्धेमुळे जो अंतरीय सुन्दर मिलाफ आणि विकास होतो व त्यामुळें त्याचें पर्यवसान आत्मज्ञानाचा दिव्य अनुभव मिळविण्यांत कसें होतें तें आपण पाहिलें. या लेखांत श्रद्धा या विषयाविषयी समाजात ज्या काही गैरसमजुती रुढ झालेल्या आहेत, त्यांचा आपण विचार करूं.

श्रद्धा हा शब्द उच्चारतांच सर्व साधारण माणसाच्या निव्वळ स्वार्थ बुद्धीनें मनांत निर्माण होणारी कांहीं तरी व्यवहारीक इच्छा व त्यासाटीं केलेली इष्ट देवतेची उपासना ही कल्पना मनांत उभी रहाते. हा समज इतका दृढमूल झाला आहे कीं श्रद्धा म्हणजेच वासनापूर्ति, इच्छापूर्ति, संकट निवारण आणि तें सुद्धां काही व्यवहारिक बाबीसंबंधी असावे – नाही असलेच पाहिजे असे वाटल्यामुळे श्रद्धेचें स्थान हास्यास्पद झाले आहे. असें होण्याचें कारण आपण श्रद्धा या विषया विषयी खोल व तात्त्विक विचार कधीही करत नाही. ह्या संबंधी नीट विचार केला तर आपल्याला असे दिसून येईल की श्रद्धा ठेवण्याची सुरवात मानवी मनात इष्टपूर्तिसाठी जरी असली तरी देखील त्यांचे रूपांतर श्रद्धा कालांत हळूहळू श्रद्धेकरीताच श्रद्धा या तात्विक प्रणालींत होतें. अत्यंत लोभी आणि व्यापारी वृत्तीच्या माणसाला खरी खुरी श्रद्धा कुठेही ठेवताच येत नाही. अशी माणसे साध्या व्यवहारातील श्रद्धा सुद्धा क्षणोक्षणी डावलत असतात. त्याना अतिंद्रिय प्रान्तावर श्रद्धा ठेवणे हे अशक्य असते. तेव्हा श्रद्धा ह्या प्रान्तातून अशा लोभी, व्यापारी माणसाना आपल्याला वगळावेंच लागेल. मी ठेवलेल्या श्रद्धेच्या किमतींत मी काटा खरेदी करू शकलो असे निरखून पहाणारी माणसे 'अिदं नास्ति परंच न लभ्यते' अशा अनुभवाने आयुष्यातल्या सर्वच प्रान्तात फुकट जेरीस मात्र येतील. उलट पक्षी भोळे श्रद्धावान लोक आपल्या इष्ट कामनेची पूर्ति न झाल्यास आंतरिक ओलाव्यामुळे आपण ठेवलेल्या श्रद्धेत नकळत आपला व्यवहारीक लोभीपणा तर नाही ना असे वाटून दिवसेंदिवस श्रद्धा दृढच करत जातात. याचें कारण श्रद्धेमध्ये असलेली आत्मविश्वास वाढविणारी अफाट शक्ति हेंच होय. ज्या भावनांनी ही श्रद्धा दृढमूल होते त्या भावनांच्या ठिकाणी शरीर, मन, बुद्धी या तिन्ही प्रांताना भेदून थेट आत्मस्वरुपापर्यंत जाण्याची एक नैसर्गिक शक्ति असते हेंच त्याचे उघड कारण

आहे. श्रद्धेच्या बळावर कठीण परीक्षेमधून पास झालेले, नोकरीत वर चढलेले, व्यापारात यशस्वी झालेले, इतकेंच काय परंतु आपली असाध्य ध्येये सुद्धा साध्य करून घेतलेले असे कित्येक श्रद्धावान व्यवहाराच्या प्रांतात पदोपदी नजरेस पडतात. मोल्याशा सैन्याच्या बळावर मोठमोठ्या लढाया जिंकणारे श्रीशिवाजी महाराज, नेपोलियन, सिकंदर यासारखे जगत्‌जेते केवळ श्रद्धेवरच, ह्या आश्चर्यकारक गोष्टी जगात करून नावारुपास चढले. ह्याला जगाच्या इतिहासाची साक्ष आहे. अतिंद्रिय प्रांतात श्रद्धेची शक्ति व्यवहारिक प्रांतापेक्षा कित्येक पटीने जास्त वाढते. व्यवहारात अतिशय कठीण प्रसंगातसुद्धा इच्छीलेलें फळ सतत समोर ठेवून माणूस प्रयत्न करीत असतो. तरी देखील तेथे देखील काही–काही प्रसंग असे येतात की केवळ 'श्रद्धे-रिता श्रद्धा' हीच तत्त्व प्रणाली निर्माण होते. ही स्थिती व्यवहारिक माणसाच्या नेहर्मीच्या अनुभवाची आहे. मी यशस्वी होईन ही एकच भावना मूळ धरुन त्याला त्याच्या ध्येयापर्यंत पोचविते. तर अतिंद्रिय प्रांतात जेथे प्रेम, शरणागती, विनयशीलता वगैरे अत्युच्च भावना श्रद्धावान माणसाच्या मनात उत्पन्न होतात तेथे त्या अनेक भावनांचे एक समयावच्छेद फळ त्याला थेट आत्मस्वरुपापर्यंत कसे बरे नेऊन पोहोचविणार नाही याचा वाचकांनी नीट विचार करावा.

श्रद्धा म्हणजेच भावना असल्यामुळे तिचे स्थान मानवाच्या हृदयांत आहे. यामुळे श्रद्धा निर्मितीबरोबर एका बाजूने शरीर व दुसऱ्या बाजूने बुद्धी ह्या द्वैतील त्रिविध गुणांचा सुंदर संगम भावनांच्या ठिकाणी करावयाची श्रद्धेमध्ये एक अद्वितीय शक्ति आहे. सुरवातीला श्रद्धा म्हणजे केवळ भावना ही जरी आंधळी असली तरी पुढील शरीर मन बुद्धीचा एकत्र मिलाफ झाल्यावर म्हणजे श्रद्धेच्या उत्तरोत्तर वृद्धींगत होणाऱ्या अवस्थेमध्ये ह्याच श्रद्धेला ज्ञानचक्षु फुटू लागतात. व भगवंतानी गीतेत सांगितल्याप्रमाणे 'श्रद्धावान लभते ज्ञानं' या स्थितीकडे श्रद्धा वाटचाल करू लागते. श्रद्धेतील या बुद्धीचे रुपांतर क्रमशः 'ऋतंभरा प्रज्ञा' व तदनन्तर 'स्थितप्रज्ञा' या अवस्थेत हळूहळू होऊ लागून 'देवाने जरी आम्हाला सोडले तरी आम्ही देवाला सोडणार नाही' किंवा 'काय तुम्ही येथे नसलसे झालो आम्ही न पाहिले पाहिजे ते. अशा श्री तुकाराम महाराजाच्या आत्मविश्वास युक्त उक्तीमध्ये होऊ लागते.

परमेश्वर सत्, चिद्, आनंद स्वरूप आहे. चिद् ही प्राणशक्ति असून ती चरा-चरातून चैतन्य स्वरूपात नटून, मानवाच्या देहात पूर्णपणे भरुन राहिली आहे, तर आनंद ही शक्ति माणसाच्या भावनांची निदर्शक स्थिती असुन ती माणसाच्या हृद-याला व्यापून राहाते. सत् ही माणसाच्या बुद्धीची निदर्शक शक्ति आहे व म्हणूनच ती माणसाला सारासार विचार करावयास लावते. या तिन्ही शक्तीचा योग्य प्रमाणात मिलाफ करण्याची शक्ति फक्त श्रद्धेच्या म्हणजे भावनांच्या मध्येच आहे. व म्हणूनच त्याच्या दृढ गतीने श्रद्धा हा त्रिवेणी संगम घडवून आणून परमेश्वर स्वरूप होण्यास

माणसाला मदत करते, तितक्या द्रुत गतीने नुसते बुद्धीजन्य ज्ञान किंवा शरीरजन्य कर्मे करू शकत नाहीत आणि म्हणूनच ज्ञानयोगाला कर्मयोगाला भक्ति योगापेक्षा कनिष्ठ दर्जाचे, अवघड व यातायातीचे म्हटले आहे.

उत्क्रांतीमध्ये दिवसें दिवस माणसातील बुद्धी तत्त्व झपाट्याने विकास पावत आहे, व त्यामुळे अखिल मानवजात या बुद्धीतत्वातून प्रसूत होणाऱ्या या ज्ञानशक्तिकडे आश्चर्याने पाहून दिपून जात आहे. बुद्धीच्या बळावर माणसाने जणू काही इकडची सृष्टी तिकडे करून विश्वामित्र ऋषीसारखी आश्चर्यजनक सुखसोयींनी समृद्ध अशी प्रतिसृष्टी निर्माण केली आहे.व उत्तरोत्तर त्यात आणखी आश्चर्याची भर पडली आहे. अशा या सन्क्रमण काली मानवाला मानवाचा पूर्ण विसर पडणे सहाजिकच आहे. उत्क्रान्तीच्या इतिहासत ज्यावेळी शरीर तत्त्व ओलांडून भावनातत्त्व मानवात विकास पावू लागले, त्यावेळी 'बळी तो कान पिळी हिंसा वगैरे निव्वळ शारिरिक शक्तीच्या जोरावर केलेल्या आपल्या आर्य पूर्वजांच्या कृतींची चहा होऊ लागली. अगदी तद्वतच बुद्धी तत्त्व झपाट्याने विकास पावत असताना भावनामय श्रद्धेची जगात टरच उडत आहे हे अगदी व अनैसर्गिक नाही परंतु एक वेळ अशी खात्रीने येईल की ज्यावेळी खरीखुरी मानवी संकृति ही शरीर, हृदय व बुद्धी या त्रयीच्या समतोल वाढीतूनच निर्माण होते याची मानवाला खात्री पटेल व त्यावेळी श्रद्धेला तात्पुरते गमावलेले तिचे स्थान परत मिळेल.

बुद्धीतत्त्वाचा कितीही विकास होत असला तरीही जगात विशेष बुद्धीमान व कनिष्ठ बुद्धीमान अशा श्रेणी माणसा – माणसामध्यें रहाणारच. बुद्धीची सर्वांगीण वाढ होण्याकरिता जरूर असलेले शिक्षण मोठमोठ्या शहरात रहाण्यास उपलब्ध असलेल्या सुखसोई व अडचणी, आदि भौतिक विविध प्रांतांतील दूरवर ध्वनी अथवा प्रकाश वहाणारी उपकरणे व त्यांचा मुबलक पुरवठा अगर दुर्मिळता वगैरे सर्व गोष्टीवर अवलंबून रहाणारच. या सर्व गोष्टीने विचार केल्यास जगातील शिक्षीत, बुद्धीमान पुढारलेल्या लोकांचे प्रमाण अशिक्षित,मागासलेल्या बहुजनसमाजापेक्षा कमीच असणार. परमेश्वराच्या अस्तित्वाची व साक्षात्काराची प्रमेय निव्वळ बुद्धीच्या जोरावर सोडवू पहाणाऱ्या, हल्लीच्या सुधारलेल्या लोकाना बुद्धीतत्वामुळे दिपून गेल्याने असे वाटते की परमेश्वर व त्यासंधी विचार ही आमचीच मक्तेदारी आहे व त्यामुळे भावनामय श्रद्धेची ते नेहमीच ढर उडवित असतात. परंतु सर्वज्ञ, सर्वसाक्षी, सर्व जनहितकारी, बुद्धी, भावना, शरीर याना चालना देणारा परमेश्वर सर्व जाणूनच असतो. व म्हणूनच अबुद्धीमन, अशिक्षित, केवळ रानटी समजल्या जाणाऱ्या जंगलातल्या भोळीविक्याच्या श्रद्धेलासुद्धा तो तावडतोब साथ देतो. इतक्या सुलभ तऱ्हेने परमेश्वर प्रकर्ष बुद्धीच्या पंडिताला ही वश होणार नाही. कारण बुद्धीच्या

प्रकर्षांबरोबर स्वाभाविकच त्या पंडितात अहंमन्यता वाढीस लागते. व तीच नेमकी त्यांच्या साक्षात्काराच्या आड येते. तसे त्या भोळ्या, अशिक्षित परंतु श्रद्धावान मोळीविक्याच्या ठिकाणी होत नाही, क्षणार्धात साक्षात्कारी पुरुष बनून त्याच मोळीविक्याला परमेश्वर शरीर, मन, बुद्धीच्या अतिंद्रिय प्रांतात नेऊन आत्मज्ञान करून देतो व त्यापुढं मोठमोठ्या पंडितांचीसुद्धा नंतर त्याच्यापुढं डाळ शिजत नाही. याची उदाहरणे शालेय शिक्षण न घेतलेल्या श्री रमणमहर्षि, श्री रामकृष्ण परमहंस, श्री साईबाबा अशा थोर पुरुषांच्या चरित्रांवरुन आपल्या नजरेस पडतात. या थोर पुरुषांना त्या थोर पदवीला चढवायला त्यांची निव्वळ परमेश्वरावरील श्रद्धाच उपयोगी पडली ही गोष्ट निर्विवाद आहे.

अशा तऱ्हेने श्रद्धा या विषयावर विचार केल्यास निव्वळ दगडाना देव मानणारे आपण हिंदु लोक तेहत्तीस कोटी देव स्वरुपे मानून सुद्धा निव्वळ श्रद्धेने हा भवसागर कसा तरुन जातो व तोच एखादा पाश्चात पंडित बुद्धीच्या प्रकर्षाने सुद्धा हे देवांचे अनेकत्व मानणाऱ्या हिंदु समाजाला निव्वळ अडाणी, भोळा-भाबडा समजून, आपल्याच बुद्धीचातुर्यात कसा निमग्न असतो ते आपल्याला कळून येईल. 'भाव तेथे देव' या लहानशा तीन शद्वात श्रद्धेची सर्व थोरवी कशी सामावलेली आहे हे आपल्या लक्षात यावे व त्याबद्दल आपल्याला कोणत्याही प्रकारचा संशय राहू नये म्हणून हा लेख लिहीण्याचें प्रयोजन.


# गद्यरूप श्रीदासबोध सार

लेखक : डॉ. व. सी. कानविंदे

दासबोधाच्या अभ्यासकांकरितां अत्यंत उपयुक्त पुस्तक.

**किंमत फक्त रु. ३-५०. ट. ख. निराळा. पृष्ठे १८२**

मिळण्याचें ठिकाण:—

**ग्रंथायन मराठी पुस्तक विक्रेते,**

**ए ११ गुडविल बिल्डिंग, माहीम-मुंबई १६**

# कशाला जाऊ मी पंढरपुरीं ?

चाल—गझल

कवि : द. ब. पोतनीस

पाहुनीं साईंचीये नगरी
भासते दुसरीच ही पंढरी ॥धृ॥

पंढरीमधें उभे विटेवरी विठ्ठल रखुमाई
शिरडी मधें भव्य शिळेवर श्री सद्गुरुसाई
आषाढी कार्तिकी पंढरी मधें जमती मानकरी
तशीच वारी भक्तजनांची होते गुरुवारी
भासते दुसरीच ही पंढरी १

पंढरीमधे अखंड होतो विठ्ठल जयघोष
तसाच चाले दरबारामधे साईनाम घोष
विठ्ठल विठ्ठल मृदंग बोले नाचती वारकरी
साई साई जय घोषानें दुमदुमते नगरी
भासते दुसरीच ही पंढरी २

विठ्ठल नामें तरंगू लागली गाथा इंद्रायणी
द्वारकामाई मधे जळते अखंड आज धुनी
भक्तासंगे रंगरंगला पंढरीचे श्रीहरी
दरबारामधे आजही रंगती शिरडीचा श्रीहरी
भासते दुसरीच ही पंढरी ३

चंद्रभागे तीरी बसविली पंढरीने पंढरी
श्रीसाईंचे कृपे जाहली पावन ही नगरी
शिरडीमधे सद्गुरुसाई उभे विठ्ठलापरी
विठ्ठल मिळण्यासाठी कशाला जाऊं मी पंढरपुरीं
भासते दुसरीच ही पंढरी ४

# मृत्युपूर्वीचें निवेदन

परिस्थितीनें निर्दयपणें दशरथाला एक कृत्य करायला भाग पाडलें होतें. ह्या कृतकर्मामुळें त्याचें अंतःकरणच केवळ भंगून गेलें असें नव्हे, तर त्याला स्वतःचाच द्वेष करण्यास भाग पाडलें, त्याला स्वतःची कींव करण्याचीसुद्धां संधि ठेविली नाहीं. स्वतःचें वचन मोडणें किंवा रामावर अन्याय करणें ह्या शृंगापत्तींत फक्त एकच मार्ग होता, तो म्हणजे रामानें दशरथाची आज्ञा न मानता स्वतःच्या हक्कांचाच पाठपुरावा करावयाचा. परंतु, रामानें आपल्या पित्याविषयींच्या कर्तव्याला अग्रस्थान दिले. राम म्हणजे सीता व लक्ष्मण यांना जीव की प्राण होता. म्हणून तींही त्याच्याबरोबर गेलीं होतीं.

दुःखांत व पश्चात्तापांत अंथरुणावर पडून राहून मनस्तापाने तडफडणाऱ्या दशरथाला कौसल्या टाकून बोलली.

त्या चावऱ्या शब्दांवाटे कौसल्येच्या दुःखाला तोंड फुटलें; परंतु त्यामुळें दशरथाला असह्य वेदना झाल्या. तथापि, अशा प्रकारें आपल्या भावनांना वाट करून दिल्यामुळें कौसल्येवरील ताण मात्र कमी झाला:

"आपला शब्द पाळला गेला आणि तरण्या कैकेयीला खूष करतां आलं, म्हणून तुम्हांला अभिमान वाटत आहे. परंतु, दुसऱ्यांबद्दल थोडा तरी विचार केलात का? माझं सबंध विश्व तुमच्यांत सामावलेलं होतं. तुम्ही मला देवासारखे होतां; इहलोकांतील माझा आनंद आणि परलोकाविषयी माझी आशा तुमच्यांत एकवटली होती आणि आतां तुम्हीच मला असं टाकून दिलं आहे. माझ्या जीवनांतील प्रकाश असलेल्या माझ्या पुत्राला माझ्यापासून हिरावून घेऊन त्याला हद्दपार केलंत. आतां मी इथें एकाकी पडून आहे. असहाय नी वयातीत. माझ्या पतीचं प्रेम माझ्या एकुलता एक मुलगा माझ्या नजरेसमोर नाहीं. ह्यापेक्षा अधिक दुःख कोणा स्त्रीच्या वांट्याला आलं असेल? पण तुम्हीं . . तुम्हीं जें केलंत, त्याबद्दल तुम्हांला आनंद नाहीं होत?

"कैकेयी आणि भरत सुखांत आहेत, एवढंच तुम्हांला पुरेसं आहे. आणि चौदा वर्षांनीं वनांतून आल्यावरसुद्धां राम ह्या सुखांत व्यत्यय आणील अशी चिंता करायचं तुम्हांला कांहींच कारण नाहीं. एकदां भरतानें हातीं घेतलेल्या राजदंडाला राम

स्पर्शही करणार नाहीं. दुसऱ्यानें मारलेल्या पश्याला वाघ कधींच स्पर्श करीत नाहीं. मासा जसा आपल्याच पिलांना खातो, तसाच तुम्हीं आपल्या पोटच्या गोळ्याचा बळी घेतला आहे !"

ह्या घाव दशरथाच्या वर्मी बसला. आत्यंतिक वेदना होत असूनही तो हात जोडून कौसल्येकडे वळला, त्यानें क्षमेची याचना केली.

"कौसल्ये, मला क्षमा कर," तो खालच्या आवाजांत म्हणाला, "तिऱ्हाइतांनाहि तूं क्षमा केली आहेस, त्यांच्यावर दया केली आहेस. नेहमींच तुझ्यावर प्रेम करीत आलेल्या व तुझा सन्मान करणाऱ्या आणि आतां औषध नसल्या दुःखाच्या आघातानें अंतः करण भंगून गेलेल्या ह्या तुझ्या पतीबद्दल थोडी तरी करुणा बाळग."

ह्या करुण शद्वांनीं आपल्या पतीची ती दीन अवस्था पाहून, तसेंच आपण जोडीनें सुखांत घालविलेल्या क्षणांचें स्मरण होऊन सत्वशील कौसल्येचें हृदय चरकलें. "दुःखातिशयानें काय वाटेल तें बोलल्ये" असें म्हणून पतीचे पाय धरून तिनें त्याची क्षमा मागितली.

ते जड क्षण मंदगतीनें पुढें सरकत होते आणि फार पूर्वी घडलेली एक घटना दशरथाला आठवली, व त्याचें दुःख शतपटींनीं वाढलें. तो कौसल्येला म्हणाला,

"देवी, तूं अद्यापि इथेंच आहेस का ? केलेल्या कर्मांची फळं कधींच चुकवतां येत नाहींत. फार काळापूर्वी केलेल्या एका महापातकाचं प्रायश्चित्त आतां मला मिळत आहे. क्षणिक व किंचित् सुखाकरतां माणसं अज्ञानानें महापातकं करतात आणि मग वेळ आली कीं त्या पातकांची जबर किंमत द्यावी लागते.

"तेव्हां मी तरुण होतों. लक्ष्य न पाहातां निव्वळ शद्वावरून वेध घ्यायचं कौशल्य मला अवगत होतं. कौशल्याची परिक्षा पहायला म्हणून गेलों असतां एकदां माझ्या हातून एका निरपराध व्यक्तीची हत्या झाली. हें फार मोठे पातक माझ्या हातून घडलं. ती करुण कथाच आतां मी तुला सांगतों, ऐक.

"तुझा-माझा विवाह होण्यापूर्वीची गोष्ट. एके दिवशी रात्रीं मी शिकार करण्याकरतां रथातून शरयू नदीच्या तीरावर गेलों. मुसळधार पाऊस पडत होता आणि मातकट रंगाचे ओहोळ डोंगरांवरून वाहात होते. पक्षी मुके झाले होते. अरण्य झोंपी गेलं आहे, असं वाटत होतं. तहानेलेला एखादा वाघ किंवा अस्वल किंवा आणखी एखादं जनावर नदीवर पाणी पिण्याकरीतां आलं कीं त्याला न पाहातांच निव्वळ आवाजाचा वेध घेऊन मी बाण सोडणार होतों. धनुर्विद्येंतील माझं कौशल्य मला पारखून घ्यायचं होतं. सर्वत्र गडद अंधार दाटला होता. रानटी जनावर यायची वाट पाहात मी बसून राहिलों.

"आणि मग पाण्याचा बुड्बुड् असा आवाज मीं ऐकला. हत्ती पाणी पीत

असेलसं मला वाटलं. ताबडतोब धनुष्याला बाण लावून आवाजाच्या दिशेनें मीं नेम घेतला. विषारी सापासारखा फुस्कारत तो बाण सुटला आणि त्यानें लक्ष्याचा वेध घेतला. परंतु 'हाय! मेलों!' असे मानवी उद्‌गार कानीं आल्यावर मला धक्काच झाला.

"त्या माणसाचे शब्द परत मला ऐकू आले, 'कोण माझा शत्रु असेल? मीं कधींहि कोणाला अपाय केलेला नाहीं. मग मी असा पाण्यानें घडा भरून काय लाभ? अरण्यांत तपस्व्याचं निष्पाप जीवन व्यतीत करण्याबद्दल कुणीं मनांत द्वेश कां बाळगावा? आतां माझ्या अंध मातापित्यांचं कसं होणार? त्यांची काळजी घेण्यास आतां कुणीच नाहीं. हाय देवा!

"भयंकर भीतीनें अंगभर कांपत मी उठून राहिलों. धनुष्य आणि बाण माझ्या हातांतून गळून पडले. आवाजाच्या दिशेनें मी गेलों आणि एक तरुण जटाधारी तपस्वी रक्तानें आणि धुळीनें माखून तिथें पडलेला मला दिसला. त्याच्या शेजारींच एक उपडा घडा पडलेला होता. त्याच्या नजरेंत आगीचं तेज होतं. त्यानें जेव्हां मला पाहिलं, तेव्हां तो ओरडला, 'मला मारणारा पापी तो तूंच काय? मी नदींतून पाणी भरून घेत असतांना तूं आपला बाण माझ्यावर कां म्हणून रोखलास? माझे वृद्ध मातापितर तहानेनें आश्रमात माझी वाट पाहात आहेत आणि मी पाणी घेऊन येईल अशी त्यांची समजूत आहे. तूं मला कां मारलंस? हे देवा माझी तपश्चर्या, माझी भक्ति, सर्व कांहीं निष्फळ झालं ना! मी हा असा इथें बाण लागून असहाय अवस्थेत आहे, हे माझ्या मातापित्यांना माहीतहि नाहीं. ते तसेच वाट पाहात बसून राहातील आणि त्यांना कळून तरी काय उपयोग? ते तर अंध आणि असहाय. ते काय करणार? तूं आहेस तरी कोण? काय? तू कोशल देशाचा राजा आहेस? आणि तूच, राजानेंच माझं रक्षण करण्याचे सोडून माझा वध केला आहेस! बरं तर? राजा आतां तूं जा आणि आपण काय केलंस ते त्यांना सांग. त्यांचें पाय धर आणि क्षमेची याचना कर नाहींतर त्यांच्या संतापानें तुझं भस्म होऊन जाईल. आतां तू तडक आश्रमांत जा. पलीकडील वाटेनें जा. परंतु हा बाण आतां मला खुपत आहे, तो बाहेर काढ आणि जाण्यापूर्वी मला या यातनांतून सोडव.'

"त्याच्या शरीरांतून बाण बाहेर काढला तर त्याच्या यातना बंद होतील हे खरंच आणि त्याचबरोबर रक्ताच्या उसळीनिशी त्याचा प्राणहीं बाहेर पडेल हे मला माहीत होतं. एक क्षणभर मी स्तब्ध उभा राहिलों. काय करावं ते मला समजेना.

"मग तो तरुण संन्यासी परत म्हणाला, 'आतां बिचकूं नकोस. माझी ही

यातना थांबव. माझं मन आतां स्वच्छ व चित्त शांत झालं आहे. तेव्हां न डगमगता बाण बाहेर काढ आणि माझ्या प्राणाला मुक्ति दे.'

" इलकेच मी बाण बाहेर काढला. तो तरुण संन्यासी कुशीवर वळला आणि सुस्कारा सोडून व नजर माझ्यावर रोखून त्याने शेवटचा श्वास सोडला."

" हा माझा अपराध आतां माझ्या मागे लागला आहे. त्या अंध मातापित्यांचा पुत्र मी हिरावून नेला. त्यांचंच दुःख आतां माझ्या वांट्याला आलं आहे."

दशरथ पुढं बोलू लागला, " आतां पुढं काय झालं, ते ऐक'—

" हातून हे पातक घडल्यावर आणि त्या तरुण तपस्व्याला प्राण सोडतांना पाहिल्यावर, पुढं काय करावे याचा विचार करीत मी तसाच तेथे उभा राहिलों. त्यानें सांगितल्याप्रमाणे करणे हे आपले कर्तव्यच आहे असा शेवटी निर्णय करून, मी घडा विसळला आणि पाण्याने भरून घेऊन तपस्व्यानें सांगितलेंल्यां पायवाटेने चालायला सुरुवात केळी.

" मी त्याच्या पर्णकुटीजवळ पोंचलो आणि मुलाची वाट पाहात असलेली वृद्ध पति-पत्नी मला तिथे दिसली. अंगापासून पंख तुटलेल्या आणि हालचाल करण्याची कुवत नसलेल्या दोन पांखरांसारखी ती दोघं तिथं बसलेली होती. दोघंहि आंधळी होती.

" पाणी आणायला गेलेला आपला मुलगा अजून कसा आला नाही, याबद्दल तीं चिंता व्यक्त करीत होती. मी जसजसा त्यांच्या जवळ जवळ आलों, तसतशी मला भयंकर भीति वाटू लागली.

" माझ्या पावलांचा आवाज ऐकून तो वृद्ध तोंडातल्या तोंडांत म्हणाला, ' का बाबा इतका उशीर झाला तुला ? दे थोडेसे पाणी ने मला प्यायला. तुझ्या आईलाहि तहान लागली आहे. तूं नदीत डुंबत होतास काय ? तूं असा गप्प कां बाबा ? तूं दुखावला जावास असं कांहीं माझ्याकडून वा तुझ्या आईकडून घडलं असेल, तर ते तू मनाला लावून घेऊ नकोस. तू आदर्श पुत्र आहेस. आमचा एकुलता एक आधार आहेस. आमची दृष्टी तर गेलेलीच आहे आणि तूच आमचे डोळे आहेस. आमच्या प्राणापेक्षांहि तू जास्त मोलाचा आहेस. परंतु अजून तू गप्प कां ! तुझा राग अजून गेला नाहीं का ?

" त्या दंतहीन वृद्धाला अशा रीतीने बोलतांना पाहून मला भीतीनं कापरं भरलं. धीर एकवटून मी बोलू लागलों, ' हे साधुपुरुषा, माझं नाव दशरथ, मी आपला पुत्र नव्हे, परंतु आपली आज्ञा पाळण्यास आणि सेवेस मी बांधलेला आहे. प्रारब्धा-मुळे माझ्या हातून एक भयंकर पातक घडलं आहे आणि लज्जित होऊन आतां मी

आपणांसमोर उभा आहे. हिंस्रपशूंना मारण्याकरतां म्हणून मी नदीतीरावर गेलों होतों. पाण्यांतील आवाजावरून हत्ती पाणी पिण्यास आला असावा असं मला वाटलं आणि शब्दवेधी धनुर्धाऱ्याप्रमाणे मी धनुष्यास बाण लावला. माझ्या दुर्दैवाने आणि आपल्या पुत्राच्या नियतीनें, आपला पुत्र पाणी भरीत असतांना आवाजावरून तो हत्ती आहे असे वाटून मी सोडलेला बाण आपल्या पुत्रालाच लागला. अशा प्रकारें मनांत नसतांहि आपल्या पुत्राला भयंकर जखम झाली. मी त्या स्थळीं जाऊन पाहिलं, तो मी मारलेला बाण आपल्या पुत्राच्या छातींत घुसला होता आणि तो तिथं रक्तांत पडला होता. मीं स्वतःस शिव्याशाप दिले. मला अतिशय भीति वाटली आणि मी दिङ्मूढ झालों. नंतर त्याच्या विनंतिप्रमाणे मीं तो बाण उपसून बाहेर काढला आणि मरणप्राय यातनातून त्याला मुक्त केलं. तो आतां जिवंत नाहीं. माझ्या हातून घडलेलं महाभयंकर पातक मीं आपणांस सांगितले आहे. आपण द्याल तीं शिक्षा भोगण्यास तयार आहे."

"आपल्या पुत्राची ही भयंकर कहाणी ऐकून दुर्दैवी पतिपत्नी स्तंभित झालीं. त्यांच्या दृष्टिहीन नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. शेवटीं तो वृद्ध म्हणाला, 'राजा, तुझं पातक खरोखरच महान् आहे. परंतु, अज्ञानामुळें तें तुझ्या हातून घडलं आहे आणि तूं प्राणास मुकणार नाहींस. आतां आम्हां दोघांनाहि तू त्या स्थळीं घेऊन चल. आम्हांला आमच्या प्रिय पुत्राला ह्या हातांनीं स्पर्श करूं दे व त्याची यमाकडे पाठवणी करूं दे,' ज्या स्थळीं त्यांचा पुत्र मृत होऊन पडला होता, तिथें मी त्यांना नेलं. त्यांनीं त्यांच्या सबंध शरिरावरून हात फिरविला, तीं दोघंहि रडलीं, त्यांनीं त्याच्या आत्म्यास आशीर्वाद दिले आणि उत्तरक्रिया उरकली.

"नंतर चितेवर चढून स्वतःला अग्नीच्या हवालीं करण्यापूर्वी माझ्याकडे वळून ते म्हणाले, 'तूं आम्हांला दिलेलं हें महान् दुःख योग्य वेळीं तुझ्याहि वांट्यास येईल. तुझा पुत्राच्या विरहाच्यां दुःखानेंच तुलाहि मृत्यु येईल.' असं म्हणून त्यांनीं स्वतः अग्निभक्षण केलं व त्यांचे आत्मे देवलोकीं गेले.' माझं पातक मात्र माझ्या पाठीशींच लागलं आणि आतां त्यानें मला पकडलं आहे.

"माझा पूर्वीचा अपराध आतां माझा प्राण घेत आहे. वैद्यांनीं पथ्य म्हणून सांगितलेलं अन्न रोग्यानें खाल्लं असतां तें ज्याप्रमाणें रोग्याचा प्राण घेतें त्याचप्रमाणें असह्य दुःखाने त्या वृद्धानें उद्गारलेले शब्द आतां खरे ठरले आहेत. माझ्या निष्पाप पुत्राला मीं वनांत धाडलं आहे. त्याच्या विरहाचं दुःख असह्य होऊन मी आतां यमसदनात प्रवेश करीत आहे.

"नाहींतर ह्या मुलखावेगळ्या घटना कशाला घडल्या असत्या ? नाहींतर मी

असा फसवला कां गेलों असतों ? नाहींतर माझा असा विश्वासघात कां करण्यांत आला असता ? मीं जरी रामाला वनवासी होण्यास सांगितलं असलं, तरी त्यानें माझी अन्याय्य आज्ञा शिरोधार्य कां मानावी ? वनवासी होण्याचा आग्रह त्यानें कां धरावा ? हा निव्वळ त्या वृद्ध मातापित्यांचा शाप आहे, दुसरं कांहीं नाहीं !

" कौसल्ये, तूं मला दिसत नाहींस. माझी दृष्टि गेली आहे जलद गतीनें मरण जवळ येत आहे. तूं अधिक निकट ये. मला तुला स्पर्श करूं दे. सर्व कांहीं संपलं आहे. यमाचे दूत मला बोलावीत आहेत. राम येईल का? मरण्यापूर्वी मला त्याचें दर्शन होईल का ? हाय, माझा प्राण जात आहे. सारं तेल संपले आहे आणि माझी ज्योत विझत आहे. हाय कौसल्ये ! हाय सुमित्रे ! "

त्याची प्राणशक्ति हळूहळू ओसरलीं आणि त्याच रात्रीं कोणीही सचिव आमात्य जवळ नसतांना दशरथानें शेवटचा श्वास सोडला.

महाकाव्याच्या आरंभींच्या भागांत वाल्मीकीनें दशरथाचें वर्णन केलें आहे कीं तो सर्व वेदशास्त्रांत व्युत्पन्न, अत्यंत दूरदर्शी, अनेक यज्ञयाग केलेला, इंद्रियजय मिळविलेला, अनेक मित्र असलेला, धर्मनिष्ठ व अजातशत्रु प्रख्यात राजा होता. त्याची शक्ति इंद्राच्या तोलाची होती. त्याचें भांडार कुबेराच्या तोलाचें होतें. राजनीतींत तो मनूसारखा होता. अशा दशरथानें आपल्या प्रिय पुत्रास वनांत पाठवावें व स्वतःभंगलेल्या अंतःकरणानिशीं प्राण सोडला आणि त्याच्या सन्निध समदुःखानें पोळलेल्या दोन पतिनिष्ठ पत्नीखेरीज कोणीं नसावं. अशी नियतीची योजना होती.

शुद्ध हरपणें व परत शुद्ध येणें हे प्रकार इतक्या वेळां झाले होते, कीं त्याचा मृत्यु कौसल्येच्या किंवा सुमित्रेच्यां लक्षांतच आला नाहीं. दुःखानें आणि शुश्रुषेनें त्या थकल्या होत्या आणि दमून भागून महालांत एका कोपऱ्यांत झोंपीं गेल्या होत्या. पहांटे नेहमीप्रमाणें राजाला उठविण्याकरीतां गायक व वादक त्याच्या शयनागारांत आले व वाद्ये वाजविण्यास व नित्याचीं स्तवनें गाण्यास त्यांनीं सुरुवात केली.

परंतु, राजा जागा होण्याची लक्षणें त्यांना दिसेनात. राजाच्या प्रातर्विधीला साहाय्य करणाऱ्या सेवकांनींही खूप वेळ कां झोंपला असावा याबद्दल ते आश्चर्य व्यक्त करूं लागले. मग थोड्याशा धिटाईनें त्यांनीं शयनागारांत प्रवेश केला. तेव्हां राजाचा अंतकाळ झालेला त्याना दिसला.

तात्काळ ही वर्ता सर्वत्र पसरली आणि राजप्रसाद शोकानें भरून गेला. दशरथाच्या मृत्युमुळें विधवा झालेल्या राण्या आत्यंतिक शोकानें एकमेकास मिठया मारीत पोरक्या मुलांसारखा रडल्या.

———

# शिशुविभाग कोनशिला समारंभ

## श्री. द. दि. पाटणकर यांचें भाषण

श्री साईनाथ रुग्णालयांतील शिशुविभागाच्या कोनशिला समारंभास आज आमच्या आमंत्रणाला मान देऊन आपण सर्व उपस्थित राहिलांत याबद्दल संस्थान तर्फे मी आपला अत्यंत आभारी आहे.

श्री. साईबाबाचें वचन प्रसिद्ध आहे. शिरडीस ज्याचे लागतील पाय. टळती अपाय सर्व त्याचे." या वचनाची सत्यता असंख्य भक्तांना पटली आहे व म्हणूनच शिर्डीस तें गर्दी करतात. अपाय दोन प्रकारचें असूं शकतील, मानसीक व शारिरीक. मानसीक अपाय टळतात. याबद्दलची सत्यता प्रत्येक भक्ताच्या मनाला पटलेली असणारच. शारीरीक अपाय दूर करण्याकरितां श्री साईबाबांच्या प्रेरणेनें माडगांवकरां-सारख्या दात्यांना स्फूर्ति होऊन ही रुग्णालयाची भव्य व सुसज्य अशी वास्तू येथे उभी राहिलेली आपण आज पहात आहा. या रुग्णालयासारखीं रुग्णालये आपल्या या जिल्ह्याच्या परिसरांत व आजूबाजूलाही थोडीच आहेत. व त्याचा फायदा वाढत्या प्रमाणांत घेतला जात आहे. यावरून तें किती उपयुक्त आहे तें दिसतच आहे त्यांत आज ज्याचा कोनशिला समारंभ होणार आहे त्या "शिशुविभागाच्या बांधणीनें अधिकच भर पडणार आहे.

हें हॉस्पिटल बांधण्यापूर्वी बरींच वर्षे जे रुग्णालय होते तें फारच लहान होते तें वाढत्या गर्दीस अत्यंत अपुरे पडत असून व सोईच्या दृष्टीनें त्यांत कित्येक उणीवा होत्या. एका मोठ्या व सुसज्ज हॉस्टिलची गरज बरेंच दिवस भासत होती. त्याकरिता, इरिगेशन खात्याची ही जमीन मिळाली व शिर्डी येथील जमीनदार हरिभाऊ शेळके यांनीं आपली कांहीं जमीन दिल्यामुळें हे हॉस्पिटल उभारणे शक्य झाले. साईबा-बांच्या कृपेनें भक्तांच्या देणगीची कमतरता भासलीच नाहीं. ७ ऑगस्ट १९६२ रोजीं तेव्हांचें चीफ मिनिस्टर ना. यशवंतराव चव्हाण यांचें शुभहस्ते पायाचा दगड बसवि-ण्यांत आला व दोनच वर्षात हॉस्पिटल तयार होऊन आजचें आपले अध्यक्ष बॅ. वानखेडेसाहेब यांचें शुभहस्ते त्याचा उद्‌घाटन समारंभ ता. १४ मे १९६४ रोजीं मोठ्या थाटानें करण्यांत आला. या इमारतीस बांधण्यास एकंदर खर्च रु. तीन लक्ष दहा हजार रु. झाला. व फर्निचर, इक्विपमेंट, इन्स्ट्रुमेंटस्, इलेक्ट्रिक फिटींग मिळून एकंदर खर्च रु.१,१६,०००-०० झाला. एकंदर ४,२६,०००-०० असा खर्च झाला.

हॉस्पिटलमध्यें सध्यां दोन रेसिडेंट क्वालिफाईड डॉक्टर असून दोन बी. पी. एन्. ए. नर्सेस, मीडवाईफ व अनट्रेन्ड दोन नर्सेस, ट्रेन्ड एक्सरे टेक्निसीअन, वॉर्ड बॉईज असा एकंदर १५ स्टॉफ आहे. पांच प्रसिद्ध डॉक्टर आठवड्यातून एक दिवस

भेट देऊन ऑपरेशन, कन्सलटेशनस् यांचा फायदा देतात. त्यापैकीं...डेन्टिस्ट व एक डोळ्याचें डॉक्टर आहेत व ते नगरहून येतात, व डॉक्टर श्रीमती पाटणकर या स्त्रीयांच्या रोगाच्या तज्ञ आहेत त्या पुण्याहून येतात. डॉ. सानें ऑपरेशन्सकरितां औरंगाबादेहून येतात व डॉ. गाजरे हे दर रविवारी जळगांवहून येतात.

बाहेरच्या रोग्याकरितां दवाखाना सकाळीं ८–३० तें १२–३० व संध्याकाळी ४–०० तें ६–३० पर्यंत खुला असतो.

हॉस्पिटलमध्यें एक स्त्रियांकरितां व एक पुरुषाकरितां असें दोन वार्ड असून प्रत्येकांत १२ कॉटची सोय आहे. " त्यापैकीं मॅटर्निटी केसेस् करितां ६ कॉटस् राखून ठेवलेल्या आहेत. रोग्यांना जेवणाखाण्याची सोय बाहेरून करावी लागते. पण... त्यांच्या बरोबर येणाऱ्यांना नातेवाईकांना स्वयंपाक करतां यावा याकरितां एक स्वयंपाकगृह बाजूला बांधण्याचा विचार आहे.

हॉस्पिटलमध्यें एक्सरे तपासणीची अद्यावत सोय असून रक्त, लघवी वगैरे सर्व प्रकारची तपासणीकरितां अद्यावत हत्यारे आहेत. मात्र रेफ्रिझेटर आणल्यापासून बिघडल्यामुळें रक्त साठविण्याची व देण्याची सोय करितां येणे अद्याप शक्य झाले नाहीं, " तथापी एका भक्तांने केरोसीनवर चालविण्यांत " येणारा रेफ्रिझेटर कबूल केला आहे " तो कंपनीनें अद्याप आणून बसविला नाहीं. तो आल्यावर ती ही उणीव...नाहींसी होईल.

हॉस्पिटलमध्यें घेण्यांत येणारी फी नाममात्र असून बाहेरून येणाऱ्या डॉक्टरची कन्सलटेशन फी ही पांच रुपयाहून आतां ३ रुपयापर्यंत कमी करण्यांत आली. वार्षिक १५००–०० रुपयाच्या खालीं " उत्पन्न असणाऱ्या रोग्यांना औषध पाणी व तपासणी विनामूल्य आहे.

इतक्या तऱ्हेचें सुसज्ज हॉस्पिटल शिर्डी सारख्या ठिकाणीं असेल अशी... कित्येकांना कल्पनाही नसेल.

त्यांत या शिशुविभागामुळें आणखी मौलीक भर पडत आहे.

श्रीमंत माडगांवकर साहेब यांनीं उदार अंतःकरणानें दिलेली देणगी व मे. गोडसे साहेबांनी त्या देणगीचा त्वरीत उपयोग करून घेण्याकरितां दाखविलेली आतुरता व परिश्रम यामुळें आजचा हा समारंभ इतक्या लवकर घडवून आणतां आला.

मे. मंत्री साहेबांचा शिर्डी संस्थानवर नेहमीच वरदहस्त व आशिर्वाद आहे व तसाच तो मिळत राहो अशी इच्छा प्रदर्शित करून कोनशिला बसविण्यांची...त्यांना विनंती करतो.

# श्री गुरु पौर्णिमा महोत्सव

श्रीसच्चिदानंद श्री साईनाथ महाराज यांचा श्री गुरुपौर्णिमा उत्सव सालाबाद प्रमाणें यंदाही दिनांक २० जुलै १९६७ पासून तीन दिवस श्रींचे समाधी मंदिरात श्रीसाईबाबा संस्थानशिर्डी तर्फे मोठ्या उत्साहानें पार पडला.

या उत्सवास मुंबई, पुणें, नाशिक, मद्रास, आंध्र, म्हैसूर, नागपूर, मराठवाडा अशा बऱ्याच ठिकाणाहून भक्तलोक आपल्या कुटुंबातील मंडळी मुलाबाळासह आले होते. तसेच पंढरपूर आषाढी यात्रेकरू परत शिर्डीस फार मोठ्या संख्येनें येऊन गेले.

उत्सवाचा कार्यक्रम — दिनांक २० गुरुवाररोजीं पहाटे नित्यकार्यक्रमा व्यतिरिक्त बाबांचे फोटो व पोथीची मिरवणूक मंदिरातून गुरुपादुका मार्गें श्रींचें द्वारकामाईत भव्य-चांदिचे सिंहासनात फोटोची स्थापना व पोथीचे पारायणास आरंभ झाला. दोनप्रहरी नित्यकार्यक्रमानंतर संस्थान गवई विठ्ठलराव मराठे यांचे सायंकाळीं ५ ते ७ पर्यंत गुरु भक्ती याविषयावर सुश्राव्य कीर्तन झालें. रात्रौ श्रींच्या पालखीची गांवांतून मिरवणूक होऊन नित्याची शेजारती झाली.

दिनांक २१ शुक्रवार रोजी पहाटे नित्यकार्यक्रमा व्यतिरिक्त श्रींचे फोटोची व पोथीपारायण समाप्तीची मिरवणूक गुरुपादुका मार्गें मंदिरात आली. नंतर नित्याचे मंगलस्नान वगैरे होऊन भक्तांचा सामुदायिक पूजा अभिषेक वगैरे झाली. श्रींचे वस्त्रांची प्रसादरूपानें विक्री करणेत आली. दुपारी ४॥ ते ६॥ पर्यंत संस्थान गवई विठ्ठलराव मराठे यांचे गुरुभक्ती यावर सुश्राव्य कीर्तन झाले. रात्रौ श्रींचे रथाची गांवांतून भव्य मिरणूक [ सूरसनईचौघडा मंगलवाद्य ] बँडनादन भजनी दिंडी लेझिम-ताशे वाजंत्री स्काउटबँड पथक [ गारुड भरूडगौळणी ] यासह नगर प्रदक्षिणा घालून मिरवणूक मंदिरात आली. त्यानंतर पहाटे ६ वाजे पर्यंत संगीत गायन वादन कलाकार हजेरी मंदिर रात्रभर दर्शनासाठीं खुलें ठेवणेत आले. संगीत गायन वादन कलाकारात रेडिओस्टार कुमारी जयश्री शेजवाडकर मुंबई यांचे सुश्राव्य गायन झाले. तसेच दिनेश शंकर पिळणकर मुबई याच्या नकलांचा कार्यक्रम फार सुंदर झाला. तसेच पुणे येथील सनई वादनकार वसंत बाबुराव देवळकरण व मुरलीधर सोनवणें नाशिककर व दामुअण्णा दळवी श्रीरामपुरकर यांचे सनई वादन फारच उत्तम झाले. तसेंच राजाराम देशपांडे पुणें यांचे हार्मोनियम वादन व रघुनाथ बाबुराव सांडभोर पुणें यांचे भारूड नकलांचें कार्यक्रम चांगला झाला. तसेच धी. सी.एच. आत्मा यांचे संगीत भजन तसेच इतर कलाकारांचें कार्यक्रम चांगले झाले.

दिनांक २२ शनिवार रोजी नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त श्रींचे कापडाची प्रसाद-रूपाने विक्री, भक्तांचे अभिषेक पूजाअर्चा झाली. ११ ते १२॥ पर्यंत संस्थानगवई विठ्ठलराव मराठे यांचे गोपाल काला कीर्तन दही हंडी कार्यक्रम होऊन उत्सव समाप्त झाल्याचे जाहिर करणेत आले.

या उत्सवात साईबाबा संस्थानचे माननीय कोर्ट रिसीव्हर डी. डी. पाटणकर साहेब स्वतः प्रत्येक कार्यक्रमास हजर राहून तो योग्यरितीनें होत आहेत किंवा नाहीं याकडे विशेष लक्ष देत असत. तसेंच इतर व्यवस्था भोजनगृह, पाणपोई, दिवाबत्ती स्वच्छता, टापटीप, याकडेही जातीनें लक्ष घालीत.

उत्सवानिमित्त तीन दिवस भक्तांना नेहमीचे दरात मिष्टान्न भोजन संस्थान अधिकृत भोजनगृहा मार्फत देण्यांत आलें. तसेच संस्थानचे नोकर इतर सेवेकरी व प्रतिष्ठीत मंडळीना तीन दिवस भोजनगृहा मार्फत अल्पोपहार देण्यात आला. व कलाकाराना श्रींचा प्रसाद म्हणून एक रुपया व नारळ प्रत्येकास देण्यात आला. नेहमी प्रमाणें पोलीस बंदोबस्त योग्य होता. कांहीं भक्तानी पोथीपारायण केले. कांहीं भक्तानी [ स्वयंसेवक ] होऊन श्रींची सेवा केली. उत्सवा पूर्वी सर्व खाते प्रमुखांची बैठक होऊन त्या प्रमाणें उत्सवाची ( मांडणी ) मे. कोर्टरिसीव्हर साहेब यांचे मार्गदर्शनाखाली होऊन मंडपाची व्यवस्था दिवाबत्ती रोषनाईची व्यवस्था भक्तांना उतरण्याच्या जागेची व्यवस्था पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, फराळ भोजन व्यवस्था योग्यरितीनें ठेवण्याची मुद्दाम तजवीज करणेत आली होती.

## शिर्डीवृत्त जुलै १९६७

या महिन्यात बाहेरगावचे भक्त गुरुपौर्णिमाउत्सवानिमित्त पुष्कळच आले व पंढरपुरास यात्रेला गेलेले यात्रेकरू परत शिर्डीस दर्शनार्थ फार मोठ्या संखेने येऊन गेले. कांहीं कलाकारांनी श्रीपुढें हजेरी दिली ती खालील प्रमाणें —

**कीर्तन**—संस्थान गवई श्री. मराठे यांचीं कीर्तनें नेहमीप्रमाणें झाली.

**गायन भजन**—श्री. श्रीपादराव जमखंडी पेन्शनर हुबळी

**नकला**—श्री. दिगंबर भिकाजी बिढवे शिरडी

श्री. नारायण वामन होनप. सोलापूर.

**सनई वादन**—श्री. माधवराव देढणकर पुणें. श्री. नथु पांडुरंग नगरकर पुणे. श्री. पुंडलिकराव वाघ येवला. श्री. मनोहर हरिभाऊ लोणकर पुणें.

**तबलावादन**—श्री. शंकर राघू सालकर. कोपरगाव. श्री. चंद्रकांत बंड पुणें श्री. शिवराम खडांगळे. कोपरगाव. श्री. साईदास मराठे शिर्डी

**मिरवणूक**—आषाढी महा एकादशी निमित्त श्रीचे पालखीची गांवातून मिरवणूक काढणेंत आली होती.

जुलै महिन्यांत न्यायमूर्ति जे. आर. मुधोळकर साहेब व मिसेस सौ. मुधोळकर उभयतांनीं श्रीचे साईपूजा व सत्यनारायणपूजन केले.

### हवापाणी

शिर्डी येथील हवापाणी ठीक आहे. या महिन्यांत पावसाळ्यामुळे ओढ्यांना भरपूर पाणी आले व हवा ढगाळ कुंद होती. पाऊस बराच झाला.

---